शुक्रवार, २६ एप्रिल २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २४०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 26 APRIL 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-240 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# राज्यात उष्णतेची लाट; अवकाळीचीही शक्यता

## विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मागील आठवड्याभरापासून राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणेसह कोकणात तापमानात वाढ होणार असून उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला असून पुढील चार ते पाच दिवस राज्यात मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.**

हवामान विभागाने कोकणात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गात पुढील 24 तासाता उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून हवामान विभागाकडून सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे. याउलट, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोंकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये एक किंवा दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा (30-40 किमी प्रतितास वेग) हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**राज्याच्या या भागात अवकाळी पावसाची हजेरी**

मागील आठवड्यापासून विदर्भ, मराठवाड्यात पावसाने हजेरी लावली आहे. राज्यात काही जिल्ह्यांमध्ये सलग दोन-तीन दिवस पावसाची रिमझिम सुरु आहे. आयएमडीकडून सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड परभणी, हिंगोली या भागात पावसाची शक्यता असल्याचा अंदाज आहे. त्यासोबतच पुणे, अहमदनगर, जालना, जळगाव, औरंगाबाद, वाशिम, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांना हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या भागात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे, तर काही भागात गारपीट होण्याचाही अंदाज आहे.

# सांगली जिल्हा काँग्रेसला द्रष्ट लावणाऱ्यांची द्रष्ट उतरवल्याशिवाय शांत बसणार नाही : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** लोकसभेच्या जागा वाटपात सांगलीच्या जागेवर दिल्लीपर्यंत चर्चा झाली, सोनियाजी गांधी यांनीही यावर चर्चा केली. सांगली जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या भावना व दुःख समजतो, तुमच्या भावनांचे चीज करू, काँग्रेसचे कुटुंब एकसंध राहिले पाहिजे, तुमच्या वेदनांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल परंतु आता मशाल पेटवायची आहे. सांगली काँग्रेसला ज्यांनी द्रष्ट लावण्याचे काम केले त्याची द्रष्ट उतरवल्याशिवाय शांत बसणार नाही, अशा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आजची लढाई वेगळी आहे, देशावर मोठे संकट आहे, चुकून जर मोदी सरकार पुन्हा आले तर भविष्यात निवडणूक होणार नाही. मोदी सरकारने १० वर्षात विरोधी पक्षांना प्रचंड त्रास दिला. सोनियाजी गांधी यांना ईडी कार्यालयात तासंतास बसवले, राहुल गांधी यांनाही ईडी कार्यालयात चौकशीच्या नावाखाली पाच दिवस १०-१० तास बसवले अशा मोदी सरकारला माफ करणार आहात का? सोनियाजी गांधी यांनी देशासाठी कपाळाचे कुंकू दिले, देशाच्या एकात्मतेसाठी त्यांनी पंतप्रधानपदही नाकारले हे लक्षात ठेवले पाहिजे.


यावेळी बोलताना विधीमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, २०१४ नंतर आलेले भाजपाचे सरकार वेगळ्या वाटेवर गेले, पुढच्या कालखंडात लोकशाही, राज्यघटना राहणार का बदलणार? देश वेगळ्या वळणावर जाईल का? अशी ही ऐतिहासिक निवडणूक आहे. देश हुकूमशाहीकडे चालला आहे, राज्यघटना पायदळी तुडवली, मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले. निवडणुका लागल्यानंतर काँग्रेस पक्षाची बँक खाती गोठवली. देशातील राजकीय परिस्थितीचा विचार करुन विरोधी पक्ष एकत्र आले व इंडिया आघाडीची स्थापना केली. राज्यातही महाविकास आघाडी स्थापन करून एकत्रित निवडणुकीला सामोरे जात आहे. पहिल्या टप्प्यातील चित्र सकारात्मक दिसले आहे, भाजपाला रोखणे हे आपले लक्ष्य आहे. तीन पक्षांच्या जागा वाटपाचे काम सोपे नव्हते. सांगलीच्या जागेसाठी सर्व बाजूंनी दबाव होता, खूप चर्चा झाली.

# आदर्श व उपक्रमशील शिक्षिका सौ. तृप्ती नितीन तोडकर यांना दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या हरणतळे वस्ती, ता. हवेली, जि. पुणे येथे कार्यरत असणाऱ्या शिक्षिका सौ. तृप्ती तोडकर यांनी नवोपक्रम व विद्यार्थ्यांप्रति असणारी तळमळ यातून शैक्षणिक क्षेत्रात स्वतःच्या कर्यकुशलतेने वेगळा ठसा उमटवला आहे. तळागाळातील मुलांसाठी कार्य करताना मुलांवर योग्य संस्कार व्हावेत, त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थी घडावेत, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उत्तम राखला जावा यासाठी त्या सदैव प्रयत्नशील असतात. स्वकष्टाने व मुलांच्या सहकार्याने त्यांनी एका छोट्या शाळेचे रूप बदलून सुसज्ज शाळा उभारली आहे. सौ. तृप्ती तोडकर यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेत दैनिक आधुनिक केसरीने त्यांना शिक्षण सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे.






शाळा पाहता द्विशिक्षकी, पण गेली 3 वर्षे त्या एकट्याच शाळा, प्रशासन, व्यवस्थापन, प्रशासकीय कामे व शाळेतील 66 बालचमू यांचे कार्य, संपूर्ण शालेय कामकाज उत्कृष्टपणे सांभाळत आहेत. त्यांनी शाळेत नवीन इमारत उभी राहण्यासाठी सत्य साई सेवा ट्रस्टतर्फे 7 लाखांची मदत घेतली व सुसज्ज इमारत उभी केली. त्या इमारतीचे उद्घाटन 3 मे 2023 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर सर्व मुलांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी दररोज 10 लिटर दूध व प्रोटीन पावडर नियमित सुरू केली आहे. सत्य साई सेवा ट्रस्टतर्फे आयोजित राष्ट्रस्तरीय निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये शाळेतील आरुषी सिंह या चौथीतील विद्यार्थिनीचा जिल्ह्यात तृतीय क्रमांक (हिंदी भाषेत) व प्रणव कोपर्डेचा मराठी विषयात जिल्ह्यात तृतीय क्रमांक आला. असेच अनेक विद्यार्थ्यांना अधिक गुणवंत व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी त्यांनी चालू वर्षी शाळेत एकूण 30 सर्वोत्तम उपक्रम राबवणे सुरू केले आहेत. त्यात मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासावर भर देण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षात यशवंतराव चव्हाण कला क्रीडा स्पर्धांमध्ये लोकनृत्य स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक शाळेने पटकावला आहे. यासाठी तोडकर मॅडम व विद्यार्थी यांनी खूप मेहनत घेतली होती. त्याचे यश म्हणजे एका छोट्या शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकवला. मुलांच्या बौद्धिक व शारीरिक विकासासाठी त्या प्रयत्न करतातच परंतु त्या मुलांचे मन स्थिर होण्यासाठी मनाची अस्वस्थता कमी होण्यासाठी, तणावमुक्त जीवन जगण्यासाठी, बालविकास घडून येण्यासाठी देखील कार्य करतात त्यामुळे विद्यार्थ्यांची जडणघडण उत्तम व पोषक वातावरणात होत आहे. या उपक्रमात आयोजन करताना श्लोक पाठांतर, मनन, चिंतन, ध्यानधारणा, प्रार्थना, नामस्मरण करून घेतले जाते. त्याचबरोबर शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी सर्व विद्यार्थी अस्खलित वाचन करणे, शब्दावरून शब्द डोंगर व गोष्ट तयार करणे, पहिली ते चौथी चे 50 पर्यंत पाढे पाठांतर, शाळेत स्वछ सुंदर बाग व परसबाग तयार करणे, मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व भौतिक सुविधांसाठी शैक्षणिक उपक्रमातून सर्वच साहित्य विद्यार्थ्यांना शाळेतच उपलब्ध करून देणे यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. त्याचबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा बाल आनंद मेळावा वर्षातून 3 वेळा मोठ्या प्रमाणात घेतला जातो. या वेळी मुलांना यात्रेतील मोठी खेळणी, जादूचे प्रयोग, विविध खेळ, भरपूर खाऊ व साहित्य वाटप असे नियोजन केलेले असते. गरीब कुटुंबातील विद्यार्थी स्वतःची आरोग्य तपासणी करू शकत नाही व उपचारही घेऊ शकत नाहीत. त्यामुळे तोडकर मॅडम यांनी सत्य साई सेवा संघटनेतर्फे डोळे, संपूर्ण शरीराची आरोग्य तपासणी करून घेतली व औषधोपचार पण मोफत करून घेतले. एवढे सगळे उत्तम असताना आपला विद्यार्थी जगाच्या बाजारात कुठेही कमी पडू नये म्हणून शाळेत दर शनिवारी स्पोकन इंग्लिशचा क्लास घेतला जातो. त्याच बरोबर शाळेत समाजशील उपक्रम व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यामध्ये शाळेतील मुलांनी व्हॅक्युम क्लिनर, जलशुद्धीकरण, जलचक्र, ब्रेल लिपी व कुलर अशी वैज्ञानिक साहित्य निर्मिती केली व त्यात जलशुद्धीकरण या साहित्याचा तालुका स्तर व प्रथम क्रमांक आला त्यासाठी ई लर्निंग संस्थेतर्फे बक्षीस वितरणही करण्यात आले. याचबरोबर सर्वात महत्वाचे असते ते मुलांचे व पालकांचे मन. त्यासाठी त्यांनी 'श्यामची आई' संस्कार कथामाला हा संस्कार करण्यासाठी उपक्रम सुरू केला आहे.

शिक्षिका म्हणून कार्य करत असताना हरणतळे वस्ती शाळेत त्यांना 15 वर्षे झाली. त्यामुळे सर्व भौतिक सुविधा व सुसज्ज शाळा तयार करून घेतली आहे. शाळेत एकटीच शिक्षिका असूनही शालेय नियोजन उत्तम सांभाळले आहे. त्यामुळेच शाळेची प्रगती उत्तम साधण्यात त्यांना यश आले आहे. आजच्या तरुणाईला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी विविध लेखांमधून मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रस्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. आविष्कार फाऊंडेशन कोल्हापूर व परिवर्तन संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार, सर फाऊंडेशन चा नारीशक्ती पुरस्कार व शासनाच्या जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. चालू वर्षी त्यांनी शाळेत राबवलेल्या अनेक उपक्रमांपैकी ' शिकू आनंदे जगू संवेदना संगे' या उपक्रमाची निवड राष्ट्रीय पातळीवर करण्यात आली आहे. या सर्व त्यांच्या कार्याची व ग्रामीण भागातील, तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी कार्य करण्याची तळमळ, सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी केलेले कार्य याची दखल घेऊनच सौ. तृप्ती तोडकर मॅडम यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात या पुरस्कार सोहळ्याचे वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्काराची निवड झाल्याने सर्वच स्तरांतून सौ. तृप्ती तोडकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मोदींचे हात बळकट करण्यासाठी मतदान करा : रावसाहेब दानवे

आधुनिक केसरी न्यूज


प्रा. बाळासाहेब बोराडे

जालना : मोदी सरकारने मागील दहा वर्षांत गरीब,कष्टकरी, कामगार,शेतकरी,शेतमजूर,महिला आणि तरुणांसाठी काम करून देशात गरीब कल्याणाचा अजेंडा राबवला.सत्तर टक्के आर्थिक बजेट जनकल्याणकारी योजनासाठी खर्च केले. म्हणून मोदींजींचे हात बळकट करण्यासाठी येत्या 13 मे ला विक्रमी मतदान करून मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवा असे आवाहन जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब पाटील दानवे यांनी मतदारांना केले. जालना येथे उमेदवारी अर्ज भरल्यानंतर सभेला संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जालना पालकमंत्री अतुलजी सावे,आ.अब्दुलजी सत्तार , आ.संदीपानजी भुमरे,माजी आमदार हरिभाऊजी बागडे, डॉ.विलासजी महात्मे,आ. संतोष पाटील दानवे,आ.नारायण कुचे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ.अरविंद चव्हाण,आरपीआय नेते ब्रम्हानंद चव्हाण, लहुजी शक्ती सेना प्रदेशाध्यक्ष विष्णू कसबे,भाजपा जालना लोकसभा प्रभारी एजाज देशमुख,मनसे जिल्हाध्यक्ष गजानन गीते, मनसे शहर जिल्हाध्यक्ष रवी भैया राऊत ,जालना भाजपा लोकसभा प्रमुख राजू पाटील ,विजय औताडे , भाजपा जालना जिल्हाध्यक्ष शालिनीताई बुंदे ,भास्करराव दानवे, बद्रीनाथ पठाडे प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्यांक आघाडी भाजपा इद्रिस मुलतानी यांच्यासह महायुतीतील सर्वच घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना दानवें म्हणाले की पंतप्रधान मोदी हे सामान्य कुटुंबातून आल्याने त्यांना गरिबांच्या गरजा आणि अडचणी याची जाणीव आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आपण कोविड सारख्या जागतिक महामारीवर यशस्वीरित्या मात केली. पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात कृषी क्षेत्रातही भरिव अशी तरतूद करण्यात आली आहे.मदत म्हणून वर्षाला बारा हजार रुपयांचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे.असे असतानाही विरोधक मोदींना जाणूनबुजून टार्गेट करत आहेत.फक्त मोदींना विरोध करण्यासाठी इंडिया आघाडीचा जन्म झाला आहे. संविधान बदलण्याचा आरोप भाजपवर केला जातोय. परंतु काँग्रेसच्या काळात अनेकदा संविधानात बदल केले गेले. याविषयी काँग्रेस का बोलत नाही.मागील पंचवीस वर्षांत काँग्रेसने एकदाही संविधान दिवस पाळला नाही. किंवा संविधानावर पूर्ण वेळ चर्चा घडवून आणली नाही. परंतु नरेंद्र मोदी पंतप्रधान होताच त्यांनी संविधानावर पूर्ण वेळ चर्चा घडवून आणली व संविधानाचे पूजनही केले.म्हणून गीता,बायबल ,कुराण या ग्रंथाबरोबरच संविधान हा आपला पवित्र ग्रंथ असल्याचे दानवें म्हणाले.तत्कालीन कायदेमंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पराभूत करण्यासाठी नेहरूंनी त्यांच्या विरोधात प्रचार केला होता. म्हणून बाबासाहेबांचे नाव घेऊन मते मागण्याचा नैतिक अधिकार काँग्रेसला उरला नाही. काँग्रेसने देशात अनेकवेळा सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील सरकार स्थिर आहे. फक्त भाजप व घटक पक्षच स्थिर सरकार देऊ शकतात असेहीं दानवें म्हणाले.काँग्रेसच्या काळात अनेक घोटाळे झालेआहेत.परंतु मोदीजींच्या काळात एकही घोटाळा झाला नाही. नेतृत्व मजबूत असेल तर देशाचा विकास होतो.मोदींजीनी पुढील पन्नास वर्षाच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पाची मांडणी केली आहे .मादीजिंकडे दूरदृष्टी आहे. महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष सर्व जागा जिंकणार असा विश्वास दानवेंनी व्यक्त केला. येत्या 13 मे रोजी मला प्रचंड बहुमताने विजयी करून पुन्हा एकदा नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मतदान करा असे आवाहन दानवेंनी मतदारांना केले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी





या भल्या माणसाचं नाव संजय गायकवाड असं आहे. तो फार काही शिकलेला नाही पण कामापुरतं जुजबी लिहिणं वाचणं त्याला अवगत आहे. मध्यम बेताची उंची, साधे पण स्वच्छ कपडे, चेहऱ्यावर समाधानाचे भाव असे त्याचे व्यक्तिमत्व. संजयच्या घरची परिस्थिती तशी अगदीच सामान्य. एक मुलगा आणि एक मुलगी. त्याची पत्नी शेतात मजूर म्हणून कामाला जाई. पण आपल्या परिस्थतीबाबत त्याने कधी तक्रार केली नाही. कामाला येताना स्वतःबरोबर कोमट पाण्याची बाटली तो घेऊन येतो. चहा तो कधीच घेत नाही. कधी काही खायचं विचारलं तर, त्यालाही नकार असतो. पहाटे पाच पासून त्याचा दिवस सुरु होतो. घरी ध्यान, प्राणायाम करून मग तो आपल्या कामावरजातो. सकाळी सात वाजल्यापासून त्याचं कामं सुरु होतं. सगळी कामं करून साडेदहा अकरा वाजेपर्यंत तो आपल्या घरी जातो. तोपर्यंत कडकडून भूक लागलेली असते. घरी गेल्यावर साधे भाकरी भाजीचे जेवण. दुपारी थोडा वेळ आराम. संध्याकाळची वेळ त्याची हक्काची. त्या वेळी जवळच्या एका निर्जन ठिकाणी असलेल्या मंदिरात तो ध्यानाला जाऊन बसतो. त्यावेळी कोणाचाही फोन न घेणे, समोरची व्यक्ती कितीही मोठी असली तरी, आपल्या दिनक्रमात बदल न करणे या गोष्टी त्याच्यासाठी नित्याच्याच. त्या वेळेत कोणाकडे लग्नकार्य असलं तरी तिथे तो आपल्या बायको मुलाला पाठवणार.
पुढे पुढे तो माझ्याकडे दर आठवड्याला कामासाठी म्हणून येऊ लागला. बाहेर बागेत काम करताना तो मोबाईलवर भजनं ऐकायचा.



# हितगुज

पुष्प ४९वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## नामदेव कीर्तन करी

भागवतात कीर्तनाचे सामर्थ्य सांगितले आहे.कलियुगात सर्वश्रेष्ठ काय आहे तर परमेश्वराचे कीर्तन.कलियुगात अनंत दोष आहेत असे जेव्हा परमेश्वर नारदाला सांगते झाले त्यावेळी नारदानी विचारलं की मग यावर काय उपाय आहे? इतके दोष जर कलियुगात असतील तर याच्यावर मात करणारे काही औषध आहे की नाही?आणि मग त्यावेळी भगवंत म्हणाले अत्यंत प्रभावी असे एकच औषध आहे ते म्हणजे कीर्तन. भक्ताने हरिरूप व्हावे एवढे सामर्थ्य या किर्तनात आहे.ज्यावेळी टाळ,मृदुंग वाजू लागतात, पखवाजावर थाप पडते त्यावेळी या मातीला भक्तीचा गंध यायला लागतो आणि माणसेच काय विटेवरचा विठ्ठल सुद्धा डोलायला लागतो, इतके सामर्थ्य त्या कीर्तनात आहे. म्हणून लक्षावधी माणसे पंढरपूर माझे माहेर या भावनेने धावत सुटतात.माझे जीवीची आवडी, पंढरपुरास नेईन गुढी,गोविंदाचे गुणी वेधीले, पांडुरंगी मन रंगले.कारण तो पांडुरंग सर्व सुखाचे आगर आहे. नामदेव नरसी पंढरपूरला आले आणि कीर्तन भक्तीचा पूर्ण महिमा त्यांनी त्या पुण्यक्षेत्रात अनुभवला. पांडुरंगाच्या कीर्तनाचा त्यांनी एवढा अधिकार प्राप्त करून घेतला की प्रत्यक्ष पांडुरंगालाही आपल्यासमोर नाचवण्याचे सामर्थ्य त्यांच्या कीर्तनात आले. स्वतः जनाबाईनेच,नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग अशा शब्दात नामदेवांचा गौरव केलाय. वारकऱ्यांच्या अंतकरणात विठ्ठलाच्या नामाची गोडी तर असतेच पण त्या कीर्तन भक्तीच्या गोडी बरोबर विठ्ठलाच्या स्वरूपात बुडी घेण्याचा प्रयत्न भक्त करतो. हरी कीर्तनाने निर्लज्जपणा प्राप्त होतो परंतु हा निर्लज्जपणा कोणता? ऐहिक पातळीवरील निलाजरेपणा इंद्रियांचे चोचले पुरवण्यासाठी आलेला असतो.कामातुराणा न भय न लज्जा,ही म्हण सर्वश्रुतच आहे. परमार्थातील निलाजरेपणा हा असा अधोगतिकडे नेणारा नसून तो आत्मोन्नतीकडे नेणारा आहे.ऐहिक निर्लज्जपणात विनाश आहे तर पारमार्थिक निर्लज्जपणात वैभव आणि प्रत्यक्ष परमेश्वराचा लाभ आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**



# आनंदी पहाट

## मनाची चंचलता आपल्याला अस्वस्थ करते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या रोजच्या दगदगीतून विश्रांती हवी असेल तर सायंकाळी चहापानाच्या वेळी देखील आपण ध्यान करू शकतो. ध्यानाच्या कालावधीची, ही एकच वेळ आपल्या स्वतःसाठी राखून ठेवलेली वेळ असली पाहिजे. पंचेंद्रियांची सगळी कवाडे बंद करून, मनाची चंचलता थांबवून स्वतः सोबत राहून गाढ विश्रांती मिळवणे त्यावेळी निश्चितच शक्य होत असतं. शरीरा इतकेच आपल्या मनाचं स्वास्थ्य देखील महत्वाचं असतं. दिसणाऱ्या शरीराची जितकी काळजी घेतली जात असते, तितकी न दिसणाऱ्या मनाची आपण खरंच घेत नाहीत. आपल्याच मनाचा, मनाप्रमाणे, मनापासून, मनमुराद, मनसोक्त, मनातल्या मनांत तरी विचार करत नाहीत. आणि करत असलो तर तो किती, कसा आणि कधी करत असतो, हे पाहणे महत्वाचे असते. आजच्या जीवनात आपल्या बदलेल्या जीवनमानामुळे अनेक आजार उद्भवतात. मनावर अनेक प्रकारचे ताण येत असतात. कालांतरानं रोग हे शरीरावर दिसायला लागतात. परंतू त्याचं मूळ स्थान आणि उगम आपलं मनच असतं. त्या दृष्टीने आपल्या मनावरच आपलं लक्ष केंद्रित व्हायला हवं. आपली श्रीमंती पैशांत नाही तर मनःशांतीमध्ये असते हे सर्वप्रथम प्रत्येकानं समजून घ्यायला हवं. पैसे मिळवण्याच्या स्पर्धेत आपण काहीअंशी यशस्वी होतो परंतू मानसिक अस्वस्थता पत्करून ते यश प्राप्त केलं जातं. मनःशांती हीच खरी श्रीमंती असते, हे लक्षात घेतलं पाहिजे. मन हेच रोगाचं मूळ कारण असतं. मन शांत करणे आणि त्यासाठी ध्यान करणे, हाच त्यावरील रामबाण उपाय असतो. दैनंदिन कामाच्या राम रगाड्यापासून, कौटुंबिक जबाबदाऱ्यामधून काही ठराविक वेळ ध्यानासाठी राखून ठेवावा. सकाळी ध्यान करणे उत्तम, ज्यामुळे आपण संपूर्ण दिवसभर मानसिक पातळीवर शांत, आनंदी राहण्यास आपल्याला मदत होते.



आधुनिक केसरी

## फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||


पंचमहाभूते | देहात वसले ||
श्वासाने फुंकले | पंचप्राण ||१||
चांगल्या वांगल्या | गुणांची पेरणी ||
केली उभारणी | बुध्दी सवे ||२||
विकाराने केला | मनाशी शेजार ||
सवे अहंकार | एक झाले ||३||
वांगल्याची मात | चांगल्याची माती ||
भ्रष्ट होय मती | दानवाची ||४||
पूर्व पुण्याईने | लाभला हा देह ||
परी माया मोह | घात करी ||५||
संतांच्या संगती | रमे माझ्या मना ||
फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

देह आत्म मन शान्ति है,
ताप क्षीण वल आय ।
हँस अमर आनन्द है, अमृत पियत अघाय
।।६५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/६५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
त्या अमृत प्रवाहाने आत्मा आणि मनाला शांती मिळते. शरीर आणि मनाचा ताप नष्ट होऊन, जीवन प्राप्त होते आणि आत्मा अमृत परमानंदास प्राप्त करून पूर्ण तृप्त होऊन जातो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सत्व म्हणजे "जाणीव" तम म्हणजे "नेणीव" रज म्हणजे "जाणीव नेणीव" यांचे मिश्रण होय. या विश्वातील विविधता पाहून आपण अचंबित होतो. कधी कधी तर आपली बुध्दी चालत नाही. कारण एकदा का प्रकृतीचा विस्तार होऊ लागला म्हणजे मग एकातून दुसरे निर्माण होत जाते. उदा. पाण्याची वाफ आकाशात जाते त्याचे ढग तयार होतात व पाऊस पडतो. हे आपण शाळेपासूनच शिकत आलो आहोत. महाभूते पाच आणि गुण तीन मिळून आठ झाले. पांच भूतापैकी प्रत्येकाचा कमीजास्त भाग आणखी तीन गुणांचे कमीजास्त प्रमाण हे दोन्ही मिळून अक्षरशः अनंत प्रकारच्या दृष्य वस्तू निर्माण होऊ शकतात.

# निश्चयपूर्वक नामस्मरण आणि चित्तशुद्धी

आधुनिक केसरी



मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. पूर्वी सहा-सहा तास बसून जप केलेला असेल, तितका आता होत नसेल, तितके बसवणार नाही. मध्ये-मध्ये झोप लागत असेल, हे मान्य आहे; पण स्मरण राहू शकत नाही असे नाही होणार. मन थकले ही खरी अडचण नसून मनाचा इतर व्याप फार आहे हे खरे कारण आहे. तेव्हा, सर्व व्यापांतून आणि काळजीतून लक्ष काढून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो हे मी खात्रीने सांगेन. पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा, माणसाला भगवंतापासून दूर नेतात; त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे, त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत.
धर्माचरण, भगवद्भक्ती, नामस्मरण आणि सत्संग हे चित्तशुद्धीचे उपाय होत. किंवा एकाच शब्दात असे म्हणता येईल की, सत्संग हाच याला तोडगा आहे. चित्तशुद्धीचे लक्षण हे की, आपल्यासारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी, 'सर्व जग सुखी असावे' अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा, म्हणजे हळूहळू भगवत्कृपेने साधेल. अभिमान हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे, आणि तो केव्हा डोके वर काढील आणि घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड टिकवूया आणि आनंदाने राहूया. **१२४. नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी दृढ भावना करावी.**

# निरूपण

आधुनिक केसरी

**नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ ।
नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ॥ ४१ ॥
आग्न लागला सेती । धान्यें बणव्या आणी खडकुती ।
युक्षदंड जळोन जाती । अकस्मात ॥ ४२ ॥
ऐसा आग्न लागला । अथवा कोणी लाविला ।
हानी जाली कां पोळला । या नांव आदिभूतिक ॥ ४३ ॥**

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २६ एप्रिल २०२४

adhunikkesari.com


# वृत्तपत्रांच्या प्रश्नांवर लोकसभेत चर्चा घडवू

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाला खा. इम्तियाज जलील यांची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मी अनेक वर्षे पत्रकारिता केल्यामुळे मला वृत्तपत्रसृष्टीच्या व पत्रकारांच्या अडचणी माहीत आहेत. कोरोनानंतर मुद्रित माध्यमांची झालेली बिकट अवस्था निश्चितच चिंताजनक असून त्यावर मार्ग काढण्यासाठी वसंत मुंडे यांनी जो पर्याय सुचवला आहे, तो रास्त आहे. मी स्वतः पत्रकार असल्यामुळे संसदेत हा मुद्दा लावून धरेन. महाराष्ट्रच नाही तर हा प्रश्न संपूर्ण देशासाठी महत्त्वाचा आहे. पुन्हा संसदेत जाण्याची आपण संधी दिली तर लोकसभा अध्यक्षांना विनंती करून या प्रश्नावर विशेष चर्चा घडवून आणायला सांगेन, अशी ग्वाही खा. इम्तियाज जलील यांनी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाला दिली.
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने वृत्तपत्रांना ऊर्जितावस्था मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी लावून धरली आहे. छत्रपती संभाजीनगर लोकसभेचे एमआयएमचे उमेदवार खा. इम्तियाज जलील यांची भेट घेऊन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गुरुवार, 25 एप्रिल रोजी निवेदन दिले व चर्चा केली. या वेळी खा. इम्तियाज जलील यांनी पत्रकार संघाच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.
कोरोना वैश्विक महामारीनंतर महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला. वृत्तपत्रांचा खप व जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी वृत्तपत्र व्यवसायावर अवलंबून असलेले पत्रकार व इतर कर्मचाऱ्यांसमोर रोजगाराचाच प्रश्न निर्माण झाला आहे. देशभरात छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचा 35 हजार कोटी रुपयांचा व्यवसाय अडचणीत आला आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपयांची सूट द्यावी, अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली. या मागणीला छत्रपती संभाजीनगर लोकसभेचे एमआयएमचे उमेदवार खा. इम्तियाज जलील यांनी पाठिंबा देत या निवडणुकीत आपला विजय झाल्यास लोकसभेत हा विषय प्राधान्याने मांडला जाईल, असे आश्वासन दिले. या वेळी लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, संपादक शारेक नक्षबंदी, पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी प्रमुख संदीप घंटे, सचिन उबाळे यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.



# संविधान वाचवण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीमध्ये सविधान वाचवण्याकरिता सत्तारूढ पक्षात विरोधात लढत असलेल्या महाविकास आघाडीला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाकडून जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे या संदर्भातील पत्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांना देण्यात आले आहे. महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तसेच काँग्रेस यांच्या उमेदवारांना निवडणुकीमध्ये जाहीर पाठिंबा दिला आहे.
लोकसभा निवडणुकीमध्ये वातावरणात बदल होत आहे. देशातील जनतेने निवडणूक आपल्या हातात घेतली आहे. विद्यार्थी हा दिशा बदलत आहे. हे येणाऱ्या काळात दिसून येईल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये म्हटले आहे.
जितेंद्र आव्हाड म्हणाले की, देशांमध्ये हुकूमशाही सरकार विरोधात देशातील वातावरण बदलले आहे. देशातील जनतेने आता ही निवडणूक स्वतःच्या हातात घेतली आहे त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये सत्ता बदल होणार आहे ज्यावेळी विद्यार्थ्यांनी परिवर्तन घडवून आणण्याचे ठरवले तर परिवर्तन होतच हे अनेकदा निदर्शनास आले आहे सध्या ही निवडणूक देशातील विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासाठी हातात घेतली आहे त्यामुळे येणाऱ्या चार मे रोजी देशात सत्ता परिवर्तन होणार आता हे जवळपास निश्चित झाले आहे असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.
पुढे जितेंद्र आव्हाड म्हणाले की, देशामध्ये मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून या संदर्भात कुठलेही वक्तव्य करण्यात येत नाही आहे काँग्रेसच्या प्रियंका गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावरून पंतप्रधानांकडून नरेतिवे सेट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. दहा वर्षात कुठल्याही प्रकारचा विकास करता आला नसल्याने सध्या कुठलेही मुद्दे प्रचारासाठी नसल्यामुळेच असा प्रयत्न करण्यात येत आहे असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान बदलणाऱ्या विरोधात एकजुटीने उभ राहण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाने राज्यातील महाविकास आघाडीला पाठिंबा दिला आहे. या संदर्भातील पत्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांना देण्यात आले आहे. यासंदर्भात आज झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक निकाळजे यांनी म्हटले आहे.




# समुद्राला पावसाळ्यात २२ दिवस मोठी भरती

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** कोकण किनारपट्टीवर यंदा पावसाळ्यात २२ दिवस समुद्राला मोठी उधाणं (भरती) येणार आहेत. त्यामुळे या काळात साडेचार मीटर हून अधिक उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. २० सप्टेंबरला पावसाळ्यातील सर्वात मोठी भरती कोकणवासियांना अनुभवता येणार आहे.
दरवर्षी पावसाळ्यात समुद्राला मोठी उधाण येत असतात. या उधाणांचा किनारपट्टीवरील भागांना बरेचदा तडाखा बसत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्व समुद्राला येणाऱ्या संभाव्य मोठ्या भरतीचे अंदाजपत्रक आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत जाहीर केले जाते. या दिवशी मच्छीमारांना तसेच किनारपट्टीवरील नागरिकांना सतर्कतेचे आदेश दिले जात असतात.
यावर्षी पावसाळ्यात २२ दिवस मोठी उधाण येतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात जून मधील सात, जुलै मधील चार, ऑगस्ट मधील पाच, आणि सप्टेंबर मधील सहा दिवसांचा समावेश आहे. या दिवशी समुद्राला साडे चार मीटर पेक्षा अधिक मोठी भरती येणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर समुद्र, खाडी तसेच नदी किनाऱ्यावरील गावांना स्थानिक पातळवीर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात नदी, खाडी आणि समुद्र किनाऱ्यावर एकूण ३८५ गावे आहेत. या गावांना स्थानिक पातळीवर नियोजन करण्याबाबतचे आदेश रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिले आहेत.

# इंडिया आघाडीत प्रत्येकजण स्वतःला इंजिन समजतोय : उपमुख्यमंत्री फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** इंडिया आघाडीच्या इंजिनमध्ये फक्त त्यांच्या परिवारासाठीच जागा आहे. पंतप्रधान मोदींजीसाठी संपूर्ण देश त्यांच्या परिवार आहे आणि त्या परिवारासाठी ते काम करतात. इंडिया आघाडीत प्रत्येक जण स्वतःला इंजिन समजतोय, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंडिया आघाडीवर निशाणा साधला आहे. कडाक्याच्या उन्हात तुम्ही समर्थन देण्यासाठी आले आहात, दोन्ही उमेदवार पाच लाख मतांनी निवडून येतील, असा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला आहे.
विरोधक ही निवडणूक ग्रामपंचायत निवडणूक असल्यासारखे वागत आहे. हा देश कोणाच्या हातात द्यायचा, त्याची ही निवडणूक आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात 26 पक्षांची खिचडी आहे. आपल्याकडे मोदींच्या इंजिनवर चालणारी पॉवर फुल गाडी आहे, सबका साथ सबका विकास धोरण ठेऊन काम केले जात आहे, असं फडणवीसांनी सांगितलं. जळगावमध्ये रक्षा खडसे यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.




इंडिया आघाडी 26 पक्षांची खिचडी आहे. आपल्या महायुतीच्या गाडीचं मोदीजी हे पावरफुल इंजिन आहेत. आपल्या इंजिनाला सर्वपक्षाच्या बोग्या लागल्या आहेत, ज्यामध्ये सर्व समाजाचे लोक आहेत. इंडिया आघाडीमध्ये प्रत्येक जण स्वतःला इंजिन समजत आहेत. सगळेच इंजिन स्वतःला समजत आहेत. इंडिया आघाडीत बोग्याचं नाहीत प्रत्येक जण स्वतःला इंजिन समजतोय. राहुल गांधी म्हणतात मी इंजिन, शरद पवार म्हणतात मी इंजिन, उद्धव ठाकरे म्हणतात मी इंजिन, स्टॅलिन म्हणतात मी इंजिन, ममता बॅनर्जी म्हणतात मी इंजिन, लालूप्रसाद यादव म्हणतात मी इंजिन. तिथे इंजिनच आहेत. बोगीच नाहीत. इंजिनमध्ये सामान्य माणसाला बसायला जागा नसतो, फक्त चालक बसतो.

यांचं इंजिन हलतही नाही, डुलतही नाही

इंजिनमधे केवळ चालक बसतो. शरद पवार यांच्याकडे सुप्रिया सुळे यांना जागा आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे फक्त आदित्य ठाकरे यांच्यासाठी जागा आहे. यांच्या इंजिनमध्ये फक्त यांच्या परिवारासाठी जागा आहे, सामान्य माणसासाठी नाही. यांच्यासाठी यांचा परिवार दुनिया आहे पण, मोदींजीसाठी संपूर्ण देश त्यांच्या परिवार आहे आणि त्या परिवारासाठी ते काम करतात. म्हणून यांच्या इंजिनची अवस्था अशी आहे, राहुल गांधी इंजिन दिल्लीकडे ओढतात, पवार साहेब बारामतीकडे, उद्धव ठाकरे मुंबईकडे ओढतात, स्टॅलिन दक्षिणेकडे ओढतात. यांचं इंजिन हलतही नाही, डुलतही नाही, एका जागेवर ठप्प पडून आहे, असं म्हणत फडणवीसांनी इंडिया आघाडीवर निशाणा साधला आहे.
रक्षा खडसे यांना मतदान केले तर मोदी यांच्या इंजिनाला ताकद मिळेल आणि देशाचा विकास होईल. विरोधक केवळ शिवीगाळ शिवाय काही बोलत नाही, विकासाबाबत बोलत नाहीत. मोदी यांनी मात्र विकासाचं काम केलं. अनेक विकास योजना आणल्या. मोदी म्हणतात, महिला पायावर उभे राहते तेव्हा पूर्ण परिवार पायावर उभा राहतो, असंही फडणवीसांनी सांगितलं आहे.

# न्यायालयाचे स्पष्टीकरण

आधुनिक केसरी

आम्ही निवडणुकांवर नियंत्रण ठेवू शकत नाही. मतदानयंत्र व व्हीव्हीपॅट संदर्भातील आमच्या शंकांचे केंद्रीय निवडणूक आयोगाने निरसन केले आहे. याबाबत केवळ संशय व्यक्त झाला आहे, या कारणासाठी कोणतेही आदेश देऊ शकत नसल्याचे स्पष्ट करीत बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने मतदानयंत्रामध्ये फेराफार होण्याची शक्यता फेटाळली व यासंदर्भात दाखल याचिकांवरील निकाल राखून ठेवला. लोकसभा मतदारसंघाअंतर्गत विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येकी पाच 'व्हीव्हीपॅट'ची (कागदी पावत्या) पडताळणी होते. त्याऐवजी सर्व व्हीव्हीपॅटची पडताळणी करण्याची मागणी करणारी याचिका 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म' (एडीआर) व इतर याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये केली आहे. यासंदर्भात न्या. संजीव खन्ना व न्या. दिपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी पूर्ण झाली. खंडपीठाने बुधवारी काही तांत्रिक मुद्द्यांबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण मागितले होते. दुपारी दोन वाजेपर्यंत आयोगाने चारही मुद्द्यांवर भूमिका स्पष्ट केल्यानंतर खंडपीठाने मतदानयंत्राद्वारे होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मतपेटीद्वारे मतदान घेण्याची शक्यताही खंडपीठाने फेटाळली. मतदानयंत्र व या यंत्रांना जोडलेल्या 'व्हीव्हीपॅट' मशीनमध्ये फेराफार करता येत नाहीत, असे आयोगाने न्यायालयाला सांगितले. त्यावर, 'एडीआर'च्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी, मतदानयंत्रांच्या कार्यप्रणालीमध्ये बदल करता येऊ शकतो, असा मुद्दा उपस्थित केला. त्यावर, निवडणूक आयोगाने सर्व शंकांचे निरसन केले असून केवळ शंकेच्या आधारे निवडणूक प्रक्रियेमध्ये बदल करता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मतदानयंत्रांच्या कार्यप्रणालीमध्ये फेरफार केले जाऊ शकतात वा कार्यप्रणाली नव्याने अपलोड केली जाऊ शकते असा मुद्दा उपस्थित करून मतदानयंत्रातील संकेतप्रणालीचा स्रोत (सोर्स ऑफ कोड) उघड करण्याची मागणी करण्यात आली. मात्र, संकेतप्रणालीचा स्रोत गोपनीयच ठेवला जाईल. अन्यथा त्याचा गैरवापर केला जाण्याचा धोका असू शकतो, असे न्या. खन्ना यांनी स्पष्ट केले.

# मोफत अन्नधान्य केवळ गरिबांच्याच हक्काचे !

आधुनिक केसरी

**कॅनडाच्या 'टीडी बँके'त काम करणाऱ्या मेहुल प्रजापती या भारतीय वंशाच्या डेटा सायंटिस्टला मोफत अन्नधान्यावर हात मारल्यामुळे नोकरी गमवावी लागली आहे. कॅनडामध्ये विद्यार्थी, बेरोजगार आणि गरीबांना फुड बँकेतून मोफत अन्नधान्य दिले जाते. त्याने विद्यार्थी असल्याचा बनवा करून या फुड बँकेतून मोफत अन्नधान्य तर घेतलेच, शिवाय त्याचा व्लॉगही तयार केला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले.**

मेहुल प्रजापती आपल्या व्हिडिओत फुड बँकेतून मोफत अन्नधान्य कसे मिळवावे, याची युक्ती सांगताना दिसत आहे. प्रजापतीला नोकरीतून वर्षाला ९८ हजार डॉलरचे ( ८१ लाख रुपये ) उत्पन्न मिळत होते. तरीही तो फुड बँकेतून अन्नपदार्थ घेऊन शेकडो डॉलर कसा वाचवतो, हे तो अभिमानाने व्हिडिओत सांगत होता. प्रत्यक्ष फुड बँकेचाही व्हिडिओ त्याने काढला आहे. फुड बँकेत फळे, भाज्या, पास्ता पासून ते इतर अनेक पदार्थ मिळत असल्याचेही त्याच्या व्हिडिओत दिसत आहे.
यावर 'एक्स'वर एका युजरने लिहिले, "या माणसाला वर्षाला ९८ हजार डॉलर पगार आहे. तरीही त्याने मोठ्या अभिमानाने मोफत अन्नपदार्थांवर ताव मारून त्याचा व्हिडिओ पोस्ट केला आहे." या कॅप्शनसह सदर युजरने टीडी बँकेच्या हँडललाही टॅग केले. बँकेने याची गंभीर दखल घेत प्रजापतीवर कारवाई केली. तसेच ज्या युजरने सदर पोस्ट केली होती, त्यालाही कंपनीने उत्तर दिले. तुम्ही आमच्या निदर्शनास जी बाब आणून दिली, त्याबद्दल आपले आभार. आम्ही सदर कर्मचाऱ्यावर कारवाई केली असून त्याला कामावरून कमी केले आहे, असे उत्तर कंपनीकडून देण्यात आले.
मोफत अन्नधान्यावर केवळ गरिबांचाच हक्क आहे. मात्र अशा अन्नधान्यावर पांढर पेशी दरोडा टाकणारा भारतीय वंशाचा भामटा विदेशातही असल्याचे समोर आले आहे. गलेलठ्ठ वेतन असूनही फुकट मिळणाऱ्या अन्नधान्यावर लक्ष ठेवून असलेल्या अशा व्यक्तीमुळे विदेशात भारताची प्रतिमा डागाळली गेली नसेल का ? , त्यामुळे भारतीय नागरिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन थोडा तरी पालटू शकतो? आदी प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाही. शितावरून भाताची परीक्षा व्हावी तसे याविषयी म्हणता येईल. 'छे, ओ कुठे एकाचा मूर्खपणा इतरांनाही जड जाईल. त्याच्याकडे सरळ दुर्लक्ष करा.' असे बोलणारे भारतीय बहुसंख्येने असतील. मात्र त्याच्या फाजीलपणाकडे दुर्लक्ष न करता त्याला धडा शिकवणाऱ्या एक्सवरील युजरचे अभिनंदनच करावे लागेल. असे जागरूक नागरिक हीच देशाची खरी शक्ती असते. अशांची भारताला पुष्कळ आवश्यकता आहे.
उच्च शिक्षण घेतले. पण नीतिमत्ता आणि नैतिकता यांचे काय ? त्यावर मेडिकलमध्ये ना कुठली गोळी मिळत ना शिक्षण घेताना या सूत्राला गांभीर्याने घेतले जात








आपल्यातील अवगुण दूर करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातात. या व्यक्तीच्या प्रकरणावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, व्यक्ती उच्च शिक्षित असला तरी त्यात नीतिमत्ता - नैतिकता असेल याची अजिबात शाश्वती नाही. त्याच्या अवगुणांची छाप तो जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी तो उमटवतोच आणि तसेच झाल्याचे लक्षात आले आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध केवळ वरवर धडभले वाटतात. मात्र आतून तर खळखळाट चालू आहे. त्या देशात शिक्षण - नोकरी यांत कार्यरत असलेल्या भारतीय नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. मात्र केवळ स्वतःचाच विचार करण्याची सवय असलेल्यांना कसली आली भारताविषयी आणि येथील नागरिकांविषयी प्रेम - आपुलकी. मग तो अनिवासी भारतीय नागरिक असो वा काही कालावधीसाठी विदेशात नोकरीसाठी गेलेला भारतीय नागरिक असो.
विदेशातील कायदे किती कडक असतात याविषयी विदेशातील भारतीय नागरिक येथे परत आल्यावर आवर्जून सांगत असतात. तिकडे असे आहे आणि इकडे तसे नाही वगैरे. त्यांचे विदेशी कायद्यांच्या संदर्भात गुणगान गाणे संपता संपत नाही. पण तीच व्यक्ती भारतात असताना येथील व्यवस्थेत सकारात्मक पालट होण्यासाठी प्रशासकीय स्तरावर हालचाल करत नाही. केवळ उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम मात्र चोख बजावते. हे सोयीस्करपणे विसरते. कशाला नकोत्या भानगडीत पडायचे. असा विचार करून समोर चुकीचे घडताना दिसले तरी त्याकडे कानाडोळा केला जातो.
भारत सरकारच्या वतीने देशातील ८० कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्य देण्यात येत आहे. तसेच आगामी ५ वर्षेही ते मिळणार आहे. ठीक आहे. पण कोट्यवधी नागरिक आजही विनामूल्य अन्नधान्य द्यावे लागते. या स्थितीत पालट झाला पाहिजे. जेणेकरून नागरिकांना विनामूल्य अन्नधान्य घेण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यासाठी त्यांना स्वतःच्या पायावर अधिक सशक्तपणे उभे राहता येण्यासाठी साहाय्य कसे मिळेल. या दृष्टीने विचार व्हावा. अधिकाधिक नागरिकांचा आर्थिक स्तर उंचावणे आवश्यक आहे. यासाठी आगामी काळात जे सरकार केंद्रात सत्तेत येईल. त्यांना यासाठी पहिल्या दिवसापासूनच कार्य करण्यावर भर द्यावा लागेल.
काही नागरिक स्व खर्चाने किंवा ट्रस्टच्या माध्यमातून सर्वच स्तरातील नागरीकांसाठी नाममात्र दरात पोटभर ताजे जेवण देतात. याचे अनेक व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर उपलब्ध आहेत. तसेच विविध यात्रांच्या ठिकाणी लंगर सुविधा विनामूल्य असते. विशेष म्हणजे यात्रेकरूंना द्यायचे म्हणून कसेही अन्न दिले जात नाही. तर विविध गोड, तिखट पदार्थांची रेलचेल तिथे असते. केवळ माणुसकी म्हणून ही मानवसेवा मनापासून केली जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमरनाथ यात्रेप्रसंगी ठिकठिकाणी लंगर सुविधा असते. देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे भाविक याचा लाभ घेतात. एका बाजूला असे नागरिक आहेत, तर दुसऱ्या बाजूला वार्षिक ८१ लाख वेतन घेणारा. पण 'फुकट तिथे चिकट' याप्रमाणे वागल्याने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेणारा अतिशहाणा ठरला. त्याला नोकरी गमवावी लागल्याने तेलही गेले तूपही गेले हाती राहिले धुपाटने अशी अवस्था झाली. तसेच भारतात गरिबांसाठी जी विनामूल्य अन्नधान्याची सुविधा मिळत आहे. तिचाही लाभ घेणारे फुकटेही आहेत. प्रत्यक्षात त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असते. किंवा आधी त्यांची गरीब परिस्थिती होती. मात्र कालांतराने त्यांची मुले चांगले वेतन घेऊ लागल्याने त्यात पालट झाल्याने आता विनामूल्य अन्नाची आवश्यकताच उरलेली नाही. असे असते. मात्र फुकट मिळणारे अन्नधान्य का सोडायचे ? ही सवय अंगवळणी पडल्याने ती सुविधा सोडण्याचा मोह आवरत नाही. 'आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय.', असे होऊ नये. ज्यांना विनामूल्य अन्नधान्याची खरच आवश्यकता आहे. त्यांना ते मिळावे. बाकी, भरल्या पोटी तृप्ततेचे ढेकर देणाऱ्यांना अशा अन्नधान्याची अजिबात गरज नाही.
नेते लाखो - कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करतात. आपण तर विनामूल्य मिळणारे धान्य घेत आहोत. असे करून मोठा अपराध करतो की काय ? अशी शेखी मिरवणारे नागरिक आढळतील. भ्रष्टाचार करणारे नेते जी चूक करतात तीच चूक आपणही करणे चूकच आहे. हे स्वीकारायचेच नसते आणि स्वतःचेच खरे करायचे असते. जेव्हा आपल्यावर कारवाई होईल तेव्हाच तेव्हा पाहू तोपर्यंत तरी मिळणारी सुविधा घेत राहू. असा कोडगा विचार होतो. अन्नधान्य विकतचे किंवा मोफत असले तरी ते पिकवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागते. ऊन, पाऊस, बोचरा वारा यांचा सामना करत पिकवल्या जाणाऱ्या धान्याचे मानवी जीवनातील मोल जाणा आणि स्वार्थी विचार सोडून व्यापक विचार करा.

जयेश राणे, मुंबई

# देश सुजलाम सुफलाम करण्यात बाबासाहेबांचे योगदान



भीमराव सरवदे
संपर्क : ९४०५४६६४४१

आधुनिक केसरी

**आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या काही मोजक्याच प्रभावी व्यक्ती होत्या. त्यापैकी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष स्थान आहे. निखळ मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ते एक थोर विद्वान, राजकारणी, देशाच्या राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार आणि मुख्य म्हणजे शोषितांचे नेते अशी ख्याती ते मिळवू शकले. अनेक बाबतीत त्यांनी आपल्या नामवंत समकालीनांपेक्षा आपले वेगळे व्यक्तिमत्व उभे केले होते. एक महान विद्वान, सामाजिक क्रांतिकारक आणि राजकारणी होण्याचा गौरव त्यांनी प्राप्त केला असून हा बहुआयामी व्यक्तित्वाचा संगम क्वचितच पाहायला मिळतो.**

**(मागील अंकावरून)** इजिप्तमधील असवान धरण प्रकल्पाचे सल्लागार असलेल्या ब्रिटीश तज्ज्ञाच्या निवडीला वेवेल यांनी अनुकूलता दर्शवली होती; परंतु टेनेसी धरण प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान सहभागी झालेल्या अभियंत्याची या प्रकल्पाच्या निरीक्षणासाठी नेमणूक करावी आणि प्रत्यक्ष धरण बांधणीच्या कामासाठी तज्ज्ञ भारतीय अभियंत्याची नेमणूक करावी, असे बाबासाहेबांचे मत होते. त्यानुसार त्यांनी पंजाब प्रांताचे मुख्य अभियंता रायबहादूर ए. एन. खोसला यांच्याशी संपर्क केला; परंतु अस्पृश्य मंत्र्यांच्या देखरेखीखाली काम करण्यासाठी रायबहादूर खोसला यांना कमीपणा वाटत होता. दामोदर धरणाचा आराखडा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी टेनेसी खोरे प्राधिकरणात काम करणारे धरण बांधकाम तज्ज्ञ ड्यूअर ड्युइन यांची नेमणूक केली. डॉ. आंबेडकरांना रायबहादुर खोसला यांचे पूर्वग्रहदूषित विचार कळले तेव्हा त्यांनी खोसला यांना निरोप पाठवून बोलावून घेतले आणि त्यांना सांगितले की, मी केवळ अमेरिकेतीलच नव्हे तर कोणत्याही विकसित देशातील तज्ज्ञ अभियंत्यांची नेमणूक करू शकतो. इतकंच नाही तर तुमच्या संमतीशिवाय मी जबरदस्तीने या प्रकल्पावर तुमची नेमणूकही करू शकतो. मात्र तुमच्या नियुक्तीमागे माझा एकच हेतू आहे की, दामोदर धरण एखाद्या भारतीय तज्ज्ञ अभियंत्याने बांधावे. माझ्या माहितीप्रमाणे आपण एकमेव आर्किटेक्चरचे जाणकार आहात, त्यामुळे तुम्ही ही जबाबदारी स्वीकारावी, असे मला प्रामाणिकपणे वाटते. अशा विनम्र शब्दांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांची समजूत काढली. बाबासाहेबांचे असे देशभक्तीपर विचार ऐकून रायबहादूर खोसला यांनी त्यांची माफी मागितली आणि दामोदर खोरे प्रकल्पाचे मुख्य अभियंता पद तात्काळ स्वीकारले.
नवीन जलधोरणातील प्रमुख घटक असे होतेः ( अ ) नदी दऱ्या खोऱ्याच्या आधारे जलसंपदा विकासासाठी बहुउद्देशीय दृष्टिकोन अवलंबणे; ( ब ) नदी खोरे प्राधिकरण ही संकल्पना मांडणे; आणि ( क ) जल आणि ऊर्जा स्रोतांच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्रात तांत्रिक तज्ञ संस्थांची निर्मिती करणे. या प्रत्येकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वतःचे विचार व चिंतन होते. १९४३-४६ या काळात जेव्हा नवे धोरण तयार झाले, तेव्हा त्यांनी सर्व चर्चांमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता आणि अध्यक्षीय भाषणे व व्याख्यानांच्या माध्यमातून आपले विचार मांडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कल्पना केलेल्या साठवण योजनेमुळे सिंचन आणि वीज तर मिळालीच, शिवाय अंतर्गत जल परिवहनाची मोठ्या प्रमाणात संधीही उपलब्ध झाली. पाण्याचा बहुउद्देशीय वापर केल्याने विद्ध्वंसक शक्तींचे रूपांतर विधायक शक्तींमध्ये होऊ शकेल, असा बाबासाहेबांना विश्वास होता. या दृष्टिकोनातून त्यांनी दामोदर, महानदी, सोन आणि इतर आंतरराज्यीय नद्यांच्या प्रकल्पांवर भर दिला. दामोदर खोरे प्रकल्पावरील ३ जानेवारी १९४४ रोजी कलकत्ता येथे आयोजित पहिल्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निक्षून सांगितले होते की, दामोदर प्रकल्प बहुउद्देशीय प्रकल्प असावा, केवळ पुरामुळे निर्माण झालेल्या समस्येचा सामना न करता या अतिरिक्त पाण्याचा सिंचन, वीज आणि जलपरिवहनासाठी उपयोग करायला हवा. जलसंपदा विकासाचे आपले धोरण बहुउद्देशीय धोरण असले पाहिजे, जेणेकरून पाण्याचा विविधांगी वापर करता येईल, याची लोकांना पुरेशी जाणीव झालेली नाही सोन खोरे प्रकल्प ही एक बहुउद्देशीय नदी व्यवस्थापन योजना मानली गेली, ज्यात केवळ कालव्यांद्वारे सिंचनाची क्षमता आणि या भागासाठी बारमाही जलविद्युतच नव्हे तर अशा ऊर्जेचा कृषी विकासासाठी वाढता वापर करता येईल, जसे की ट्यूबवेलमधून पंपिंग करणे आणि पाणी साचलेल्या भागातून पाणी सोडुन जमिनीची सुपीकता वाढविणे, औद्योगिक विकासासाठी स्वस्त विजेची तरतूद, गंगेवरील सिंचनासाठी पाण्याचा सुधारित पुरवठा आणि सुधारित पूर नियंत्रण करता येऊ शकेल. मार्च १९४५ मध्ये सोन खोऱ्यासंदर्भातील परिषदेचे उद्घाटन करताना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर प्रदेश, बिहार आणि काही मध्यप्रांत आणि राज्यांच्या आर्थिक विकासासाठी या योजनेचे महत्त्व अधोरेखित केले होते. आज घराघरात वीज व पाणी उपलब्ध आहे, ही डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विकासात्मक दूरदृष्टीची देण आहे याची जाणीव प्रत्येक भारतीयांनी ठेवली पाहिजे असे मला वाटते!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ ( महाराष्ट्र ) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत ) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# यावेळी निश्चितपणे परिवर्तन होईल : आ.अमित देशमुख

## महाविकास (इंडिया)आघाडीचे डॉ. कल्याण काळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** लोकसभेची निवडणूक ही राजा विरुद्ध प्रजा अशी होत आहे. देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असलेली ही निवडणूक सामान्य जनतेने हाती घेतली असल्याने यावेळी निश्चितपणे परिवर्तन होईल, असा विश्वास राज्याचे माजी मंत्री आ.अमित देशमुख यांनी आज येथे बोलताना व्यक्त केला.
जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास (इंडिया)आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर जुना मोंढा येथील शाम लॉज जवळ मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्‌घाटन माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर जुना मोंढा भागात आयोजित प्रचार सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ.राजेश टोपे, आ.कैलास गोरंटयाल, आ.राजेश राठोड, पक्षाचे जिल्हा प्रभारी नामदेव पवार, लोकसभेचे निरीक्षक माजी मंत्री अनिल पटेल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, उमेदवार डॉ.कल्याण काळे, माजी आमदार चंद्रकांत दानवे, सुरेशकुमार जेथलीया, संतोष सांबरे, संजय वाघचौरे, एम.एम.शेख, शिवाजीराव चौथे, केशवराव औताडे,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, विलास औताडे, बबलू चौधरी, प्रकाश मुगदिया, एकबाल पाशा, रंगनाथ काळे, हरिश्चंद्र लघाने, युवा नेते अक्षय गोरंटयाल, सिटूचे नेते अण्णा सावंत, राजेंद्र राख, प्रा.सत्संग मुंढे, आपचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे, जालना शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेख महेमुद, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, दिनकर घेवंदे आदींची उपस्थिती होती. आपल्या भाषणात आ.अमित देशमुख म्हणाले की, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे हे अतिशय सामान्य कुटुंबातून समोर आले आहेत. त्यामुळे सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांची त्यांना जाणीव आहे. जालना शहरातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केलेल्या मदतीची जाणीव आपण जालनेकर आजही विसरलेले नाहीत. मराठवाड्याचा कायापालट करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले असल्याची आठवण अमित देशमुख यांनी आपल्या भाषणातून करून दिली. औरंगाबाद हायकोर्टची निर्मिती काँग्रेसच्या राजवटीत झाली असून मराठवाड्याची तहान भागवत असलेल्या जायकवाडी धरणाची निर्मिती आधुनिक भगीरथ माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या कार्यकाळात झाली आहे. त्यांना आपण विसरणार का ? साले म्हणून शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या भाजपा उमेदवाराला आपण विसरणार का ? सर्व सामान्य जनतेवर लाठीहल्ला करून गोळीबार करणाऱ्या महायुतीला तुम्ही निवडून देणार का ? असे प्रश्न उपस्थित करत आ. अमित देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्ला चढवला. समाजा समाजात भांडण लावले. आज प्रत्येक समाज एकमेकांकडे संशयाने पाहू लागला आहे. काँग्रेस राजवटीत अनेक मुख्यमंत्री होवून गेले मात्र त्यांच्या काळात असले प्रकार कधीही घडले नाहीत, असे स्पष्ट करून देशमुख यांनी सध्या सुरू असलेल्या फोडाफोडीच्या राजकारणावरही आपल्या भाषणातून सडकून टीका केली. ते म्हणाले की, लहान मुलाला विचारले तर शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांची आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांची असे तो सांगेल.



मात्र,हल्ली फोडाफोडीच्या पुढे प्रकरण गेले असून चक्क पक्षच पळवून नेले जात असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.याबाबत न्यायालयात सुनावणी सुरू असली तरी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आपण महाविकास आघाडी म्हणून जनतेच्या न्यायालयात आलो आहोत.सर्वसामान्य जनता सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून असल्याने ते या निवडणुकीत निश्चितपणे आपल्याला न्याय देतील असा व्यक्त करून डॉ.कल्याण काळे हे हात दाखवा खासदार थांबवा या पद्धतीने वागणारे आहे.
राज्यात यावेळी महाविकास आघाडीचं वारं असून मराठवाड्यात त्याचा जोर अधिक आहे. कारण हे वारं जालन्यातून सुरू झालेले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्व आठही आणि राज्यात किमान ३८ ते ३९ जागेवर महाविकास आघाडीचा विजय निश्चित असल्याचा दावा करून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यात गरीब महिलांना वर्षाला एक लाख रुपये, तरुणांना रोजगार, शेतकऱ्यांना कर्जमाफी यासह सर्व सामान्य जनतेसाठी २५ आश्वासन दिली आहे.केंद्रात सत्तेवर आल्यास पहिल्याच मंत्रीमंडळ बैठकीत त्याबाबत निर्णय घेतला जाईल असे सांगून यावेळी महाविकास(इंडिया) आघाडीच्या पाठीशी राहण्याचे आवाहन त्यांनी शेवटी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेख महेमुद यांनी केले. संचलन राहुल हिवराळे यांनी तर शेवटी आभार राम सावंत यांनी मानले.सभेस लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्वसामान्य जनता, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**देशाची वाटचाल हुकूमशाहीकडे : आ .राजेश टोपे :** केंद्रातील भाजपा सरकारच्या काळात हुकुमशाही मोठया प्रमाणात वाढली आहे .दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, सोरेन यांच्यासारख्या नेत्यांना इडी सारख्या संस्थांना पुढे करून जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे .तसेच दुसरीकडे विरोधी पक्षांचे अस्तित्व धोक्यात आणण्याचे काम भाजपाकडून सुरू असून पक्ष फोडाफोडी करून लोकशाही संपुष्टात आणण्याचे काम भाजपाकडून केले जात असल्याची घणाघाती टीका टोपे यांनी केली .हुकूमशाही थांबवायची असेल आणि लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर सर्वसामान्य जनतेने महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ .कल्याण काळे यांना विजयी करावे असे आवाहन शेवटी टोपे यांनी केले .

**शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्यांना विजयी करणार का ? अंबेकर :** शेतकऱ्यांच्या मालाला भाव देण्याचे आश्वासन देवून सत्तेत आलेल्या सत्ताधाऱ्यांनी नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले .डॉ .मनमोहन सिंग सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या कापसाला, सोयाबिनला किमान चांगला भाव मिळत होता .मात्र, या सरकारने सोयाबीन, कापसाला कवडीमोल भाव दिल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे . शेतकरी, कामगार, बेरोजगार सर्वसामान्य जनता आज त्रस्त झाले आहे . त्यामुळे या निवडणुकीत या दळभद्री सरकारला घरी बसवण्यासाठी डॉ .कल्याण काळे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले .

**४०० पार म्हणणारे दीडशे पर्यंत मजल मारतील – आ .गोरंटयाल :** मागील २५ वर्षापासून हा मतदार संघ विरोधी पक्षाकडे आहे . मात्र, यावेळी चांगली संधी आली असून अबकी बार चारशे पार म्हणणारे यावेळी अवघ्या दीडशेच्या आत गुंडाळल्या जाणार असा विश्वास आ .कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला .चारशे पार चा नारा देणाऱ्यांना शिंदे, पवार, राज ठाकरे यांच्या सारख्यांची गरज का भासली असा सवाल देखील आ .गोरंटयाल यांनी उपस्थित केला .एका नेत्याच्या मागे इडी लागली असली तरी डॉ .काळे यांच्या मागे बिडी असल्याचा उल्लेख करताच एकच हंशा पिकला .

**आपण सर्वसामान्य जनतेचे उमेदवार – डॉ .कल्याण काळे :** होवू घातलेली लोकसभा निवडणूक ही मोदी विरुद्ध जनता अशी असून जनतेचा उमेदवार म्हणून आपण निवडणूक रिंगणात उतरलो आहे .आपले प्रतिस्पर्धी भाजपा उमेदवार हे कोण आहेत सर्वांना माहीत आहे .२००९ च्या निवडणुकीत आपला या मतदार संघातून निसटता पराभव झाला होता .मात्र, यावेळी परिस्थिती अनुकूल असून कार्यकर्त्यांचा उत्साह, शेतकरी, कामगार, बेरोजगार आणि सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये सरकार विरुद्ध निर्माण चीड लक्षात घेतली तर परिवर्तन निश्चितच होईल असा ठाम विश्वास उमेदवार डॉ .कल्याण काळे यांनी यावेळी व्यक्त केला .

## आज काही काळ वीज पुरवठा बंद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** देखभाल व दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामासाठी शहरातील काही भागांत शुक्रवारी (२६ एप्रिल) काही काळ वीजपुरवठा बंद राहील. सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत नक्षत्रवाडी, शुभ लाभ, ऑक्टोझोन, जानकी हॉटेल परिसर, मातोश्री आश्रम, सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कांचनवाडी व गोलवाडी, सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत समाधान कॉलनी उपकेंद्रावरील क्रांतीनगर फीडरचा भाग, सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत सिडको एन-५, एन-६, एन-७, चिश्तिया कॉलनी, आविष्कार कॉलनी, मुकुंदवाडी, ठाकरेनगर या भागात वीजपुरवठा बंद राहील.

## अकोल्यात उमेदवारांसह दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला; छुप्या प्रचार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अकोला लोकसभा मतदारसंघातील प्रचार तोफा थंडावल्यानंतर आता उमेदवारांचा छुप्या व अंतर्गत प्रचारावर जोर आहे. तिरंगी लढतीत कोण बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून उमेदवारांसह दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. अकोला लोकसभा मतदारसंघात यावेळेस अत्यंत चुरशीची लढत आहे. निवडणूक रिंगणात १५ उमेदवार असले तरी परंपरेनुसार तिहेरी लढत होत आहे. भाजपचे अनुप धोत्रे, काँग्रेसचे डॉ. अभय पाटील व वंचित आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यामध्ये अटीतटीचा सामना आहे. यंदा दोन प्रमुख उमेदवार मराठा समाजाचे असल्याने मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होईल. जातीय राजकारण व मविभाजनाचे गणित महत्त्वपूर्ण ठरणार आहे. प्रचारात मतदारसंघातील अनेक प्रश्न व समस्यांवरून आरोप-प्रत्यारोपाचे सत्र सुरू होते. निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय चर्चाचे फड रंगात आले. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात भेटीगाठी, मेळावे, कॉर्नर सभा, बैठकांचा धडाका सुरू होता. त्यानंतर शेवटच्या टप्प्यात जाहीर सभांमधून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. भाजपचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारासाठी देशाचे गृहमंत्री अमित शहा, भाजप नेत्यांनी जाहीर सभा घेतल्या.

## साडेअठरा लाख मतदार बजावणार आज मतदानाचा हक्क

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** १८ व्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील २०६२ मतदान केंद्रातून मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. प्रशासकीय यंत्रणेची तयारी पुर्ण झाली आहे. जिल्ह्यातील १८ लाख ५१ हजार ८४३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीसाठी शुक्रवारी (ता. २६) मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.यासाठी मतदार, राजकीय पुढारी व कार्यकर्ते तसेच प्रशासकिय यंत्रणा सज्ज झाली आहे जिल्यातील १८ लाख ५१ हजार ८४३ मतदारांसाठी २०६२ मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. भोकर विधानसभा मतदार संघातून पोलिंग पाटर्या मतदानाचे साहित्य घेवून मतदान केंद्रावर रवाना झाले आहेत. निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी भेट देऊन संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली. भोकरचे उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सुरेश घोळवे, नायब तहसीलदार उमर सय्यद, विजयकुमार पाटे, यांच्या अधिनस्त पथकांनी आचारसंहिता ईव्हीएम वितरण, मंडप व भोजन व्यवस्था, वाहन व्यवस्था, मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर, संतोष कामठेकर, नायब तहसीलदार मारोती जगताप, सूर्यकांत जायभाये यांच्या अधिनस्त पथकांनी मतदान अधिकारी कर्मचारी हजेरी व्यवस्था, ओळखपत्रे वितरण, पोस्टल बॅलेट व निवडणूक कार्य प्रमाणपत्राचे वितरण, क्षेत्रिय अधिकारी समन्वय, अर्धापूरचे तहसीलदार रेणुकादास देवणीकर, नायब तहसीलदार सुनील माचेवाड, शिवाजी जोगदंड यांच्या अधिनस्त टेबल निहाय तिसरे प्रशिक्षण व मतदान साहित्याचे वितरण हे काम पाहिले मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन व पोलीस निरीक्षक सुभाष मारकड यांनी पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करून त्यांची मतदान पथकासह रविनगी केली. भोकर, मुदखेड व अर्धापूर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, शिपाई, कोतवाल, वाहन चालक, तसेच इतर सर्व शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम केले.

**साडे अठरा लाख मतदार :** नांदेड लोकसभा मतदारसंघामधील भोकर –२९४४०९ नांदेड उत्तर–३४६८८६, नांदेड दक्षिण– ३०८७९०, नायगाव–३०१२९९, देगलूर– ३०३९४३ व मुखेड विधानसभा मतदार संघातील– २९६५१६ असे एकूण १८ लाख ५१ हजार ८४३ मतदार यावेळी मतदानाचा हक्क बजावणार आहेत . तर यामध्ये ९ लाख ५५ हजार ८४ पुरुष, ८ लाख ९६ हजार ६१७ महिला व १४२ तृतीय पंथी मतदारांचा समावेश आहे . तसेच २०६२ केंद्रावर हे मतदान होणार आहे . **पोलिंग पार्ट्या पोहचल्या केंद्रावर :** सर्व केंद्रावर त्या–त्या विधानसभा क्षेत्रात पोलिंग पार्ट्यांचे ने–आण करण्यासाठी ३१ बसेस व मिनी बस १५ तर १७ जीपची असे एकुन ६३ ची व्यवस्था करण्यात आली होती . दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व पाटर्या रवाना झाल्या असून मतदान केंद्रापर्यंत पोहचल्या आहेत . **मतदान केंद्रावर व्हिलचेअरची व्यवस्था :** मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष दक्षता घेतली जात आहे . निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिव्यांग मतदार व ८५ वर्षावरील मतदारांसाठी मतदान केंद्रावर आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत . यासाठी २४७ व्हीलचेअरची व्यवस्था देखील करण्यात आली आहे .

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# लोणंद येथे महिला मेळावा संपन्न

## वैशाली शिंदे यांचे महिलांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** चैत्रगौरी हळदीकुंकू समारंभ कार्यक्रमाचे औचित्य साधून लोणंद ता.खंडाळा येथे महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता.तसेच सातारा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या पक्षाचे अधिकृत उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ महिलांना संबोधित करण्यासाठी वैशालीताई शिंदे ह्या प्रमुख मार्गदर्शिका म्हणून उपस्थित होत्या. हा कार्यक्रम सिद्धिविनायक हॉस्पिटल च्या मागे,डॉ.नितीन सावंत यांच्या हॉलवर घेण्यात आला होता.यावेळी चैत्रगौरी पारंपारिक खेळाचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते.या कार्यक्रमा वेळी प्रदेशच्या सरचिटणीस शकीला पटेल,
राष्ट्रवादीच्या प्रदेश सचिव श्रीमती शैलजा खरात,
राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या पक्षाचे जिल्हाध्यक्षा संजना ताई जगदाळे,डॉ. शुभदाताई सावंत,छंद वर्गाच्या रजनीताई शिंदे,उपजिल्हाध्यक्ष मोहिनी मिसाळ,तालुकाध्यक्ष मालन चव्हाण,नगरसेविका दिपाली शेळके,महिला मराठा पतसंस्थेच्या अध्यक्षा संगीता दरेकर,बचत गटाच्या विजया खलाटे, आदींसह महिला सदस्य व पदाधिकारी व सर्व महिला मोठ्या प्रमाणात या मेळाव्यास उपस्थित होत्या.वैशालीताई शिंदे यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले.
चैत्रगौरीचं हळदी कुंकवाचं औचित्य साधून हा कार्यक्रम संपन्न होत असताना महिला उपस्थित राहत एकप्रकारे विविध खेळांचा आनंद लुटला.यावेळी या मेळाव्याचे आयोजन व सूत्रसंचालन माजी नगरसेविका व महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी प्रदेशाच्या सचिव श्रीमती शैलजा बाबासाहेब खरात यांनी केले.तसेच आमदार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ हा मेळावा संपन्न होण्यासाठी शैलजा खरात यांनी विशेष मेहनत घेतली.यावेळी शैलजा खरात यांना महिलांनी चांगली साथ देत मेळाव्याला हजेरी दाखविली.
कार्यक्रम प्रसंगी अनेक महिला पदाधिकाऱ्यांनी मनोगते व्यक्त केली. पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या सोबत एकनिष्ठ राहिलेले आमदार शशिकांत शिंदे यांना दिल्लीत पाठविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.आपल्या सर्वांच्या मताधिक्क्यानेच आमदार शशिकांत शिंदे हे खासदार होणार आहेत.जनतेच्या व महिलांच्या समस्यांना सोडवण्यासाठी काम करणाऱ्या खासदारालाच दिल्लीत पाठविले पाहिजे.
आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या शिलेदारास म्हणजेच आमदार शशिकांत शिंदे यांना निवडुन देण्याची वेळ आलेली आहे, अशी मनोगते सुद्धा वैशाली शिंदे यांच्यासह इतरांकडून व्यक्त करण्यात आली. तसेच यावेळी महिलांनी सुद्धा संवाद साधला.

# शक्तिपीठ मार्ग शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा : संभाजीराजे

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** धरणांचा तालुका म्हणून ओळख निर्माण झालेल्या आजरा तालुक्यातील विस्थापित लोकांच्या पुनर्वसित जमिनी पुन्हा शक्तीपीठ महामार्गासाठी काढून घेतल्या जाणार आहेत. शक्तीपीठ तर कोल्हापुरात आहे. तेथे जायला कोणत्याही भाविकाने या शक्तीपीठ महामार्गाची मागणी केलेली नाही. शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचे पाप सत्ताधाऱ्यांनी करू नये. शेतकर्‍यांना उध्वस्त करणाऱ्या या महामार्गविरोधी लढ्यात शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहणार, असा विश्वास संभाजीराजे छत्रपती यांनी दिला. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील इंडिया व महाविकास आघाडीचे उमेदवार शाहू छत्रपती यांच्या प्रचाराच्या निमित्ताने आयोजित खेडे येथील प्रचार सभेत ते बोलत होते. भर उन्हात निघालेल्या पद यात्रेमध्ये ग्रामीण भागातील जनता मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. यावेळी शाहू महाराजांच्या जयघोष करण्यात आला. इंडिया आघाडी, महाविकास आघाडीचे तसेच मित्र पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी आपापल्या पक्षाचे झेंडे घेऊन सहभागी झाले होते. संभाजीराजे छत्रपती म्हणाले, तालुक्यामध्ये ठीक-ठिकाणी झालेल्या पाणी प्रकल्पांमध्ये शेतकर्‍यांनी मोठे योगदान दिले आहे. प्रसंगी स्वतःची घरदारे सोडून विस्थापित झालेली ही मंडळी आता कुठे स्थिरस्थावर होत असताना शक्तिपीठ महामार्गाचा घाट सरकारकडून घातला जात आहे. एकदा विस्थापित झालेल्या या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी पुन्हा एकदा शक्तीपीठ महामार्गासाठी संपादित होण्याची शक्यता आहे. गरज नसलेल्या या मार्गाकरिता विस्थापितांच्या दृष्टीने जमीन संपादन हे अन्यायकारक आहे. शेतकरी आता जागरूक झाला आहे. या महामार्गाला ठिकठिकाणी विरोध होत आहे. शेतकर्‍यांच्या या लढ्यात आपण अग्रभागी असू.विकासाच्या नावावर गरज नसताना कोट्यावधी रूपये उधळण्याचा हा सरकारचा डाव संघटितरित्या हाणून पाडूया असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी कॉ. संपत देसाई म्हणाले, या देशातील लोकहिताचे नवनवे कायदे कष्टकरी जनतेने लढून करायला भाग पाडले आहेत. भाजप आणि मित्र पक्षांचे हे सरकार चळवळी दडपून टाकत आहेत. म्हणूनच आम्ही दडपशाही करणाऱ्या या सरकारच्या विरोधात इंडिया आघाडीच्या बाजूने उतरलो आहोत.

# वादळवारा क्षणभर अन् लाईट जाते तासभर!

## धर्माबादेत ऐन उन्हाळ्यात महावितरणचा कारभार ढेपाळला

आधुनिक केसरी न्यूज



**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** शहरातील तसेच ग्रामीण भागातील महावितरणचा कारभार ढेपाळल्याचे चित्र दिसून येत आहे. कडक उन्हाळ्यात उन्हाने लाही लाही होत असताना दिवसातून दहा वेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मनःस्ताप सहन करावा लागत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. दुसरीकडे वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत होण्यासाठी दोन दोन तास लागत असल्याने महावितरण कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.
सूर्य दिवसभर आग ओकत असल्याने सतत उष्णतामानात वाढ होत आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेत शहरातील रस्ते ओस पडलेले दिसत आहेत. या उकाड्यापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी कुलर वापरात काढले आहेत. मात्र काही दिवसांपासून वीज वितरणकडून वीज पुरवठा वारंवार खंडित केला जात आहे. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मागील आठ दिवसांपासून वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह पाऊस हजेरी लावत आहे. दरम्यान, काही वेळासाठी वीजपुरवठा खंडित केला जातो. अथवा होतो. मात्र, स्थिती पूर्वपदावर येऊनही अनेक भागातील वीजपुरवठा तासनतास खंडित राहतो. त्यामुळे " वादळ वारा क्षणभर लाईट जाते तासभर" अशी अवस्था झाल्याने नागरिक मात्र उकाडा, डासांच्या त्रासाने हैराण झाले आहेत. महावितरणचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन नागरिकांची गैरसोय होणार नाही, याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.
कूलर, एसी, पंख्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे विजेची मागणी ही दुपटीने वाढली आहे. परिणामी, महावितरण कंपनीला सुरळीत वीजपुरवठा करताना दमछाक करावी लागत आहे. शहरातील विविध भागांत रात्रीच्या वेळी अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे. त्यातच रात्री-अपरात्री वीज खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या झोपेचा खेळखंडोबा होत आहे.

# वादग्रस्त पोलीस निरीक्षकाविरोधात जमाव संतप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु असताना नंदुरबार जिल्हा बुधवारी रात्री वेगळ्याच घटनेमुळे चर्चेत आला. जिल्ह्यातील नवापूर पोलीस ठाण्याचा निरीक्षकच लाच घेताना जाळ्यात अडकला. कारवाईची माहिती मिळताच संतप्त जमावाने नवापूर पोलीस ठाण्यासमोरच लाचखोर निरीक्षकाविरोधकात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच त्याला घेवून जाणाऱ्या वाहनावरही हल्ल्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नवापूर शहरातील पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. नवापूर तालुक्याचा प्रभारी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे हा कायमच वादग्रस्त राहिला आहे. गुजरात राज्यातील सोनगड पोलीस ठाण्यात नवापूर येथील एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याच्या तपासासाठी गुजरात पोलिसांचे पथक नवापूर पोलीस ठाण्यात आले होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे याने मध्यस्थी केल्याने संशयिताला अटक झाली नव्हती. त्या मोबदल्यात वारे याने संशयिताच्या मित्राकडे अडीच लाख रुपयांची लाच मागितली होती. त्यावेळी संबंधितांनी भीतीमुळे पाच मार्च रोजी वारे यास एक लाख रुपये दिले होते. त्यानंतर वारे याने दीड लाख रुपयांची मागणी करुन तडजोडीनंतर ५० हजार रुपये स्वीकारण्यास तयारी दर्शविली. पंचासमक्ष मागणी केलेले ५० हजार रुपये स्वीकारताना वारे यास नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी अटक केली. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे विरोधात नवापूर पोलीस ठाण्यात रात्री गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु असतानाच वारे यास अटक झाल्याची माहिती पसरली. त्यानंतर रात्री नवापूर पोलीस ठाण्याबाहेर नागरिकांनी मोठी गर्दी करुन वारेविरोधात घोषणाबाजी सुरु केली. वारे याने नवापूरमध्ये दोन समाजात तेढ निर्माण करण्याच्या अनुषंगाने काही गुन्हे दाखल केल्याचे तसेच अनेकांविरुद्ध खोटे गुन्हे दाखल केल्याचे जमावाचे म्हणणे होते.

# जरांगे पाटील यांच्या बैठकीदरम्यान दाखल झालेल्या गुन्हयामध्ये फिर्यादीस नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. 12 मार्च 2024 रोजी वसमत येथे मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांची संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. ही सदरील संवाद बैठक शांततेत पार पडल्यानंतरही वसमत ग्रामीण पोलीस यांनी रात्री 11 वाजून 27 मिनिटाला तसेच वसमत शहर पोलिस यांनी 11 वाजून 30 मिनिटाला मराठा बांधवांवर मोटार वाहन कायदा कलमे व तसेच मुंबई पोलीस कायदा आणि भारतीय दंड संहिता तसेच जिल्हाधिकारी यांची प्रतिबंधात्मक कारवाईचे आदेश या कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आलेली होती.
सदरील गुन्ह्यांमध्ये मनोज जरांगे पाटील यांना देखील आरोपी करण्यात आलेले होते. त्याच सोबत दोन्ही गुन्ह्यांमध्ये 19 आणि 11 समाज बांधवांना नावानिशी आरोपी करण्यात आले होते. आणि त्यानंतर सदरील आरोपींविरुद्ध चॅप्टर केसेस देखील दाखल करण्यात आली होती. एकाच घटनेचे दोन गुन्हे दाखल केले असल्याकारणाने आणि कुठलीही समाजविघातक कृती झाली नसल्याकारणाने सदरील गुन्ह्यांमध्ये मराठा समाज बांधव यांनी ॲड.बाळासाहेब मगर पाटील यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात गुन्हा रद्द करणे कामी फौजदारी याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेची प्रथम सुनावणी दिनांकः 23 एप्रिल 2024 रोजी झाली असता मंगेश पाटील यांच्या द्वयी न्यायपीठापुढे असे मांडण्यात आले की, सदरील दोन्ही गुन्हे हे किरकोळ स्वरूपाचे असून यामध्ये कुठलेही गंभीर गुन्ह्याची नोंद नसून तसेच प्रथमदर्शनी नाव घेतलेल्या मराठा समाज बांधवांनी प्रत्यक्ष कुठलाही गुन्हा केल्याबाबत स्पष्टपणे नमूद नाही. किरकोळ नियमांचे उल्लंघनाबाबत मोठ्या प्रमाणावर मराठा तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत तसेच सदरील दिवशी कुठलीही समाज विघातक घटना घडली नसून कुणालाही त्रास, मारहाण व इजा झालेली नाही. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची संवाद बैठक शांततेत पार पडली व याबाबतीत इतर कुणाची तक्रार देखील यंत्रणेसमोर नसताना यंत्रणेने जाणून-बुजून सदरील गुन्हे दाखल केलेले आहेत. उच्च न्यायालयाने सर्व बाजू ऐकूण सरकार पक्ष तसेच फिर्यादी यास नोटीस बजावून प्रकरण अंतिम सुनावणीसाठी ठेवले आहे. प्रकरणात वसमत तालुका येथील मराठा समाजबांधवांच्या वतीने ॲड. बाळासाहेब मगर पाटील यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडली.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# तुम्हाला लोकांच्या संवेदना कधी समजल्याच नाहीत

## सुनिल तटकरे : उपमुख्यमंत्री फडणवीस यांची पेण येथे २६ एप्रिल रोजी जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**रोहा :** अनंत गीते तुम्ही नशीबवान आहात मोदींच्या मंत्रीमंडळात तुम्हाला अवजड की अवघड खाते मिळाले. त्याचे महत्व तुम्हाला कधी कळलेच नाही. पाच वर्षांत तुम्ही मोदींच्या मंत्रीमंडळात काम करुनही एक रुपयांची गुंतवणूक आणता आली नाही तुम्हाला लोकांच्या संवेदना कधी समजल्याच नाहीत असा जोरदार हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांनी अनंत गीते यांच्यावर रोहा येथे केला. बुधवारी रेवदंडा येथे महायुतीच्यावतीने कोळी महासंघाची जाहीर सभा झाल्यानंतर रोहा येथे दुसरी सभा पार पडली. अपयश जेव्हा पचवता येत नाही त्यावेळी आत्मपरीक्षण करायचे असते असा सूचक इशारा सुनिल तटकरे यांनी विरोधकांना दिला.

४० वर्षांत विकास हेच ध्येय ठेवून जनसामान्यांच्या कामासाठी पुढाकार घेत आलो आहे. जोपर्यंत माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत विकास हेच ध्येय घेऊन काम करत राहणार असून त्यामुळेच तुम्ही मला लाखोंच्या फरकाने विजयी कराल असा विश्वास सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला. देशाच्या हितासाठी... राष्ट्रहितासाठी आम्ही एकत्र आलो आहोत...'घड्याळ तेच वेळ नवी' आहे असेही सुनिल तटकरे यांनी ठणकावून सांगितले.

घटना बदलली जाणार असा अभास निर्माण करण्याचा एकमेव कार्यक्रम विरोधकांकडे सध्या आहे.शेकाप हा एक छोटासा पक्ष पण जणू काही हाच भावी पंतप्रधान करणार अशी हाव दिसते असा टोला लगावतानाच इंडी आघाडीकडे पंतप्रधान पदाचा चेहरा नाही आणि त्यांनी जाहीर केला तर आघाडीचे तुकडे झालेले पहायला मिळतील असा दावा सुनिल तटकरे यांनी यावेळी केला. पेण येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिनांक २६ एप्रिल रोजी जाहीर सभा होत असून महायुतीच्या नेत्यांची ही माझ्या मतदारसंघातील पहिलीच जाहीर सभा होणार आहे. या सभेला मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सुनिल तटकरे यांनी केले आहे.



मुंबई महानगरपालिका म्हणजे उबाठाचा आत्मा आहे. मासा जसा पाण्याबाहेर पडल्यावर तडफडतो तसा मुंबईमध्ये महानगरपालिका महायुतीच्या ताब्यात आल्यावर तशी होणार आहे आणि आगामी येणाऱ्या निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढू त्यावेळी त्यांची अवस्था काय होईल असा जोरदार टोला सुनिल तटकरे यांनी लगावला. या महायुतीच्या सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, भाजप, शिवसेना, मनसे, आरपीआय आदींसह महायुतीचे तालुकाध्यक्ष, तालुकाप्रमुख आणि पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.





# वादळी वाऱ्यामुळे सोलर पॅनलचे प्रचंड नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** वादळी वाऱ्यामुळे केनवड व कळमगव्हाण परिसरातील शेतकऱ्याच्या शेतातील सौर पॅनेलचे नुकसान झाले आहे. नुकसानाची भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून जोर धरत आहे. दि. २३ आणि २४ एप्रिल रोजी रिसोड तालुक्यात वादळी वाऱ्याच्या थैमानामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे झाडांची पडझड होऊन काही शेतकऱ्यांच्या शेतातील मालमत्तांनाही हानी पोहोचली. यामध्ये केनवड येथील शेतकरी कमल सुधीर गोळे गट क्र. ५१७, रवींद्र साहेबराव गोळे गट क्र. ३३०, कमल शामराव केनवडकर गट क्र.३२२, नंदकिशोर वानखेडे गट क्र.५७२, नंदा विजय गोळे गट क्र.५०० आणि कळमगव्हाण मधील,पुरुषोत्तम नारायण जाधव गट क्र.१३, विद्याधर भास्कर पांडे गट क्र.४, विजय भाऊराव शिंदे गट क्र.५, एकनाथ लक्ष्मण अंभोरे गट.५,यांच्या विहिरीवर लावलेल्या सौर ऊर्जा पॅनेलचे नुकसान झाले आहे. केनवड आणि कळमगव्हाण येथील शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहेत. सरपंच-उपसरपंच, सदस्यांनी या घटनेची पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# सोन्याच्या दरात मोठी घसरण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूरसह देशभरात गेल्या काही महिन्यांपासून सतत सोन्याच्या दरात वाढ होत आहे. बघता बघता सोन्याचे दर विक्रमी स्तरापर्यंत वाढले. परंतू गेल्या दोन ते तीन दिवसांत सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. २० एप्रिलच्या तुलनेत नागपुरात २५ एप्रिलला हे दर सुमारे दोन हजारांनी कमी झाले आहे.

नागपूरसह राज्याच्या बहुतांश भागात लग्न समारंभ मोठ्या प्रमाणात होत आहेत. लग्नानिमित्त वर-वधूला सोन्याचे दागिने घेतले जातात. त्यामुळे हल्ली नागपुरातील सराफा व्यवसायिकांकडे गर्दी वाढली आहे. दरम्यान सोन्याचे दर मध्यंतरी २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७४ हजाराहून जास्तवर गेले होते. त्यामुळे लग्न समारंभ असलेल्या कुटुंबात चिंता वाढली होती. परंतु गेल्या दोन ते तीन दिवसांत हे दर खाली आले आहे. दरम्यान नागपुरातील सराफा बाजारात २५ एप्रिलला सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्रामसाठी ७२ हजार २००, २२ कॅरेटसाठी ६७ हजार १००, १८ कॅरेटसाठी ५६ हजार ३०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४६ हजार ९०० रुपये होते. तर चांदीचा दर प्रति किलो ८० हजार ७०० रुपये होते. हे दर २० एप्रिल २०२४ रोजी २४ कॅरेट सोन्यासाठी प्रति दहा ग्राम ७४ हजार १००, २२ कॅरेटसाठी ६८ हजार ९०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५७ हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४८ हजार २०० रुपये होते. तर चांदीचा दर प्रति किलो ८४ हजार १०० रुपये होते. त्यामुळे नागपुरात २० एप्रिल २०२४ या दिवसाच्या तुलनेत २५ एप्रिल २०२४ यादिवशी सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम १ हजार ९०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ हजार ५०० रुपये, १४ कॅरेटसाठी १ हजार ५०० रुपयांनी घसरले.

# कळंब शहरातील अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**ढोकी :** येथील तेरणा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात शिवसेनेचा मेळावा पालकमंत्री ना तानाजीराव सावंत साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या मेळाव्यात कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक श्री संदीप मडके यांनी शेकडो सहक-यासह शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे स्वागत ना तानाजीराव सावंत यांनी केले. याच बरोबर कळंब शहरातील उबाठा सेनेच्या सचीन सौलाखे, डॉ. गोविंद जोगदंड, बाबुराव शेंडगे, प्रशांत मोकाशे, संदीप पांचाळ, बनसोडे सर, सचीन रघुनाथ चोंदे, अनील शिंपले, शुभम जोशी, हरीभाऊ शिंपले, सुनील लांडगे, शिवाजी शिंपले, अमेय राजमाने, बंडू चोंदे, विजय काळदाते, गोविंद शिंदे, सचीन सालपे, संभाजी हारकर, खंडू हारकर या सर्वांचा ना तानाजीराव सावंत साहेब यांचे हस्ते व श्री धनंजय दादा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश झाला.

यावेळी नितीनदादा लांडगे, संजय मुंदडा, सुधीर भवर, मंदार मुळीक, शंकर वाघमारे, सागर मुंडे, संघर्ष कांबळे, शकील काझी, प्रमोद करवलकर, धम्मा विद्यागर इम्रान सय्यद, मोबीन बागवान, उत्रेश्वर बप्पा चोंदे, नियामत पठाण, आकमल काझी उपस्थित होते.

# वादळी पावसामुळे घरांची पडझड; यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने मदत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दोन दिवसांपुर्वी चंद्रपूरात सुसाट्याच्या वा-यासह झालेल्या पावसामुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली आहे. अशा कुटुंबांना आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचनेनंतर यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या संघटिका सविता दंढारे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, रुपा परसराम आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्राच्या अनेक भागात दोन दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. यावेळी सुसाट्याच्या वारा आणि विजगर्जनेसह जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. परिणामी शहरातील अनेक भागातील घरावरच्या टिना आणि कवेलू उडून गेले. तर अनेकांच्या घराच्या भिंती या पावसाने कोसळल्या. त्यामुळे अनेकांच्या घरातील विद्युत उपकरणे व धान्य खराब झाली असुन या कुटुंबांचे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा काही नागरिकांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या कडे मदत मागीतली असता पिडीत कुटुंबांना धान्य व आर्थिक मदत करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांना केल्या होत्या.

त्यानंतर यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी दत्त नगर येथील सोपान इंगळे, मंगला इंगळे, उत्तमराव गुजरकर, भारत इंगळे, पंचशील इंगळे, मयुर इंगळे रमाबाई नगर येथील तारा डोंगरे यासह अनेक नुकसान ग्रस्त नागरिकांच्या घरी भेट देत त्यांना धान्य व आर्थिक मतद केली आहे. तसेच शासनासतर्फे मिळणारी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले आहे. यंग चांदा ब्रिगेडची मदत मिळताच नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहे.



# आम्ही संविधानाशी नेहमी एकनिष्ठ आणि कायम राहणार

## सुनिल तटकरे : केंद्रसरकारच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजना खेड्यापाड्यात राबवण्याचा संकल्प केला

आधुनिक केसरी न्यूज

**म्हसळा :** माझ्या बहुजन... कष्टकरी महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा खाली उतरवण्याचे काम या मतदारसंघात केल्याचे सांगत केंद्रसरकारच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजना खेड्यापाड्यात राबवण्याचा संकल्प केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा तालुक्यातील पाभरे येथे महायुतीच्या जाहीर सभेत दिली. अनेक पायाभूत सुविधा माझ्या मतदारसंघात उभारल्या आहेत आणि उर्वरितही लवकरच पूर्ण केल्या जातील. प्रत्येक समाजाने काम सांगायचे आणि सुनिल तटकरे यांनी काम केले नाही असे कधी झाले नाही असेही सुनिल तटकरे म्हणाले. संकटे येतात ती जातपात बघून येत नाहीत. आली तर सर्वांना फटका बसतो. रायगड मतदारसंघात आलेल्या संकटकाळात इथल्या जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून काम केले. अडचणीच्या काळात इथल्या जनतेला शासनाकडून कोट्यवधी रुपयांची मदत मिळवून दिल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले. आम्ही या देशाच्या संविधानाशी नेहमी एकनिष्ठ राहिलो आहोत आणि कायम राहणार आहोत परंतु लोकांच्या मनात दूषित वातावरण निर्माण करून जाणीवपूर्वक दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र धर्मनिरपेक्ष विचार घेऊन संविधानाशी प्रामाणिक रहात काम करत असल्याची ग्वाही सुनिल तटकरे यांनी दिली. दिघी बंदर अदानी यांनी घेतले आहे मात्र यापासून माझ्या कोळी बांधवांना जराही त्रास होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचा शब्द सुनिल तटकरे यांनी दिला. या मतदारसंघात सर्व धर्मांना समावेश करणाऱ्या कामाची रचना केली आहे. हिंदू धर्मातील विविध सणांमध्ये मुस्लिम बांधव शुभेच्छा देतात आणि आम्ही त्यांना ईदीला शुभेच्छा देतो हा आमचा सर्वधर्मसमभाव आहे. हा आमचा कित्येक वर्षापासून सुरू असलेला भाईचारा निवडणूकीत येऊन खराब करु नका, असा इशाराही सुनिल तटकरे यांनी दिला. सुषमा अंधारे यांनी अदितीवर टिका केली. माझ्या महिलांना सन्मान ज्या अदितीने राज्याचे चौथे धोरण आणून दिला. ज्या लेकीने आपल्या आईचे नाव पहिल्यांदा लावण्याचा निर्णय घेतला हा मातृत्व सन्मान केलेल्या अदितीवर सुषमा अंधारे तुम्ही महिला म्हणून बोलता ही गोष्ट महिलांना नक्कीच खटकणारी आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले. माझ्या भावांना, बहिणींना ज्यावेळी गरज असते त्यावेळी आम्ही उपलब्ध असले पाहिजे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. म्हसळा तालुक्यातील पाभरे पंचायत समिती गणातील पहिली महायुतीची जाहीर सभा पाभरे गावात मोठया उत्साहात पार पडली. या जाहीर सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष समीर बनकर, भाजप तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख प्रसाद बोर्ले, मनसे तालुकाध्यक्ष सौरभ गोरेगावकर, आरपीआय तालुकाध्यक्ष राजेश तांबे आदींसह पाभरे गणातील महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



# मंदाकिनी गायकवाड यांना अंनिसचा प्रेरणा पुरस्कार जाहिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पिंपरी चिंचवड शाखा व महाराष्ट्र अंनिस ग्रंथदिंडी यांच्या वतीने रविवार दिनांक १२ मे रोजी प्रेरणा दिन साजरा करण्यात येणार आहे. या दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र अंनिस कार्यकर्ता प्रेरणा पुरस्कार (राज्यस्तरीय) सन्मान सोहळा संपन्न करण्यात येणार आहे. यावेळी काहींना हा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. ग.दि. माडगूळकर नाट्यगृह निगडी येथे हा कार्यक्रम होणार आहे. फलटण शाखेच्या कार्याध्यक्षा मंदाकिनी गायकवाड यांच्या कार्याची दखल घेत त्यांचाही प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मान होणार आहे. मंदाकिनी गायकवाड यांना प्रेरणा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.फलटण शाखेसह सातारा जिल्ह्यातील अंनिसच्या कार्यकर्त्यांकडून पदाधिकाऱ्यांकडून कौतुक केले जात आहे. हा पुरस्कार मला जाहीर झाल्या बद्दल विशेष समाधान वाटत असून या पुरस्काराने अजून काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे, असे मंदाकिनी गायकवाड यांनी म्हटले आहे.



या पुढे असेच चांगले कार्य करीत राहीन असा विश्वास सुद्धा मंदाकिनी गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.हा पुरस्कार डॉ.मनिषा सोनवणे व डॉ.अभिजित सोनवणे यांच्या हस्ते दिला जाणार आहे. तसेच डॉ.राजेंद्र कांकरिया, विश्वास पेंडसे, अनिल चव्हाण, प्राची दुधाने आदींची उपस्थिती असणार आहे.मंदाकिनी गायकवाड ह्या तरडगाव, ता.फलटण येथील असून त्या गेली अनेक वर्षापासून अंनिसचे कार्य करत आहेत. अगदी निर्भीडपणे अंनिसच्या कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिलेले आहे.समाजव्यवस्थेतील चुकीच्या विकृती त्यांनी त्यांच्या लेखातून आणि कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वाचनाची प्रचंड आवड असल्याने विद्रोही तुकाराम, नेपोलियन, बराक ओबामा, शिवाजी कोण होता, आंबेडकर प्रणाली, बुद्ध व त्यांचा धम्म, बौध्द कालीन पर्व, सम्राट अशोक, परिवर्तनाच्या वाटेवर, तिमिराकडून तेजाकडे,डार्विनचा सिध्दांत यांसारखी अनेक पुस्तके त्यांनी वाचलेली आहेत. सर्वोदय विनोबा भावे ट्रस्टची सदस्य तसेच मूलभूत अधिकार संघर्ष समितीतर्फे सदस्य म्हणून सुद्धा कार्यरत आहेत. तेलंगणा ते सेवा ग्राम पदयात्रा आणि भारत जोडो महाराष्ट्र राज्य पदयात्रा आदींमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. अंनिसच्या पदाधिकाऱ्यांच्या मदतीने चमत्कार मागील विज्ञान सादरीकरण असो किंवा विधवा प्रथा बंद प्रबोधन करण्यासाठी व्याख्यान असो किंवा विविध प्रबोधनात्मक पुस्तके लोकांपर्यंत घेऊन जाणे असो हे कार्य करण्याचा प्रयत्न मंदाकिनी गायकवाड करत आहेत.अनेक आव्हानांचा त्या सामना करत आहेत. अंनिसचे कार्य जनमाणसात घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करतच आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेण्याजोगे त्यांचे कार्य सुरू आहे. यापूर्वी त्यांना रायगड हिरकणी पुरस्कार, महिला सक्षम पुरस्कार आदी पुरस्कार मिळालेले आहेत. अंनिसच्या प्रेरणा पुरस्काराने त्यांचा सन्मान होत असल्याने नक्कीच मंदाकिनी गायकवाड यांच्या साठी एक आनंदाची बाब आहे. तसेच पुरस्कार जाहीर केल्या बद्दल मंदाकिनी गायकवाड यांनी आभार मानले आहेत.



# हनुमान मंदिर समितीकडून दानशूरांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील आनंदनगर येथील श्री हनुमान मंदिर बांधकामांसाठी भरीव आर्थिक मदत केलेल्या दानशूर व्यक्तीचा श्री हनुमान जन्मोत्सव दिनी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आहे. यात उधोजक सुबोध काकाणी, युवा नेतृत्व शंकरराव बोल्लमवाड, देगलूर येथील रहिवाशी दिपकराव शहाणे, गणपतराव तिम्मापुरे, दत्तात्रय ऐनलोड, श्रीनिवास मल्लेपेल्लू, सुधाकर पाटील जुन्नीकर, भूमन्ना अबुलकोड, अशोक येम्मेवार, मारोती चपळे, व्यंकटेश गुजराथी, शाम पाटील बाभळीकर, पिराजी पाटील चव्हाण, विनोद बोईनवाड, डॉ. लक्ष्मीनारायण केशटवार,भास्कर रेड्डी बाळापुरकर, दिलीपसेठ कामीनवार, साईनाथ सुरकुटवार, सनित शक्करवार, बालाजी मुंनलोड, श्रीनिवास अंदेलवार, राजू दलालवाड, सतिष पाटील शिंदे यांच्यासह अनेकांचा सन्मान करण्यात आला आहे. यावेळी हनुमान मंदीर समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्य तसेच महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा 'शपथनामा' जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याला 'शपथनामा' असे नाव देण्यात आले असून, यात अनेक घटकांतील लोकांना केंद्रस्थानी हा शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रचार गीत देखील रिलीज करण्याात आलं आहे.

या कार्यक्रमाला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी खासदार वंदनाताई चव्हाण, युवक प्रदेशाध्यक्ष मेहमबूब शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणीताई खडसे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप या कार्यक्रमाला उपस्थित होते.

जाहीरनामा प्रसिद्ध करण्यापूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब म्हणाले की, आम्ही मर्यादित जागा लढवत आहोत विविध प्रश्नांसंबधी आम्ही मांडणी केली आहे, त्याबाबत आमचे लोकं संसदेत आवाज उठवतील असे शरद पवार साहेब जाहीरनामा प्रकाशनाआधी म्हणाले. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी लोकं जाहीरनामा तयार करणाऱ्या समितीत आहेत. महिला आणि मुली, शेतकरी, कामगार, दिव्यांग, तृतीयपंथी, नागरी विकास, आरोग्य, पर्यावरण हे घटक डोळ्यासमोर ठेवून जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. पर्यटन, राष्ट्रीय सुरक्षा हे मुद्दे घेण्यात आले आहेत असे वंदनाताई चव्हाण म्हणाल्या.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

यामध्ये महिला, तरुण, तसेच कामगार यांच्यासह जतनिहाय जनगणना, शेतकऱ्यांना शेतमालाला हमीभाव, राष्ट्रीय सुरक्षा, उपक्षीत नागरिक, ज्येष्ठ नागरिक, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, उद्योग, कर प्रणाली, नागरी विकास, पर्यावरण, पर्यटन, कला, सांस्कृतिक यांसह शाळांचा सेफ्टी ऑडिट यांच्यासह अनेक मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी पत्रकार परिषदेमध्ये बोलताना शरद पवार साहेब म्हणाले की, मागील दहा वर्षात शेती संबधीचे प्रश्न वाढले आहेत. हा कालखंड अमित शाह यांच्या पक्षाकडे होता. या कालावधीत त्यांनी काय केलं ते सांगावे. अमित शाह यांचे शेती संबधीच ज्ञान मर्यादीत, त्यावर जास्त काय बोलायचे? त्यांनी दहा वर्षात काय केले ते सांगावं. वीस वर्ष आधी काय झाले, चाळीस वर्ष आधी काय झाले हे विचारु नये असेही शरद पवार साहेब म्हणाले.

जयंत पाटील म्हणाले की, विदर्भात गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यावर अमित शाहंकडे काय उत्तर आहे? शरद पवार साहेब कृषीमंत्री असताना आत्महत्या पाहून मनमोहन सिंगांना विदर्भात आणून कर्जमाफी करायला सांगितली होती. अजित पवार गटाने मागणी केली त्याचा आनंद आहे असेही जयंत पाटील म्हणाले.




**जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे..**

- डिग्री डिप्लोमा झाल्यानंतर पहिल्या वर्षी नोकरी मिळेपर्यंत 8,000 हजार रुपये स्टायपेन्ड देणार
- स्त्री शिक्षणातले अडथळे दूर करणार
- महिलांच्या सुरक्षेसाठी कडक कायदे करणार
- महिलांना तातडीने आरक्षण देण्याची मागणी करणार
- शेतकऱ्यांना किमान आधारभूत दर
- केंद्राचा हस्तक्षेप न करता एक आयोग निर्माण करणार
- नवीन पद्धती तंत्रज्ञान याला जास्त बळकटी देणार
- आम्ही 500 रुपयांपर्यंत गॅस सिलेंडर देऊ
- पेट्रोल डिझेल वरील कर पुनर्निमानीत करू
- शासकीय नोकऱ्यांत महिलांना 50 टक्के आरक्षण देऊ
- सरकारी यंत्रणेत कंत्राटी भरती कायमची बंद करू
- 50% च्या वरील आरक्षणाचा कायदा दूर करू
- इंदिरा सहानी प्रकरणातील 50% ची अट दूर करू
- खाजगीकरणावर मर्यादा आणू
- अग्नीवीर योजना रद्द करणार
- चीनकडून सीमेवर घुसखोरी चालूये त्यावर आमचे खासदार आवाज उठवणार
- लोकांचा निवडणुकीवर विश्वास बसला पाहिजे
- न्याययंत्रणा वेगवान करण्यासाठी बजेट देऊ
- सरकारी नोकऱ्या रिक्त जागा भरण्याचं काम करू
- 8500 रुपये स्टायपेंड पहिल्या वर्षी दर महिन्याला देऊ
- स्पर्धा परीक्षांचं शुल्क माफ केलं जाईल
- महिला व मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करू
- शाळा महाविद्यालयात सेफ्टी ऑडीट केलं जाईल
- शेतकऱ्यांसाठी आयोग स्थापन करणार त्यात केंद्राचा राजकीय हस्तक्षेप कमी करू
- शासकीय क्षेत्रात कंत्राटी भरती बंद करू
- जातनिहाय जनगणना करण्यासाठी आग्रह करू यानंतर आरक्षणातील
- 50 टक्क्यांची अट दूर करण्याचं काम करू
- खासगी शैक्षणिक संस्थात महिलांना आरक्षण देणार
- रेशनकार्ड पात्रतेच्या निकषात सुधारणा करणार
- ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय पातळीवर आयोग सुरु करू
- आरोग्यासाठी 2028–29 पर्यंत तरतूद 4 टक्क्यांपर्यंत वाढवू तसेच राज्यातील आरोग्य व्यवस्थेची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणार.
- स्वतंत्र जीएसटी समिती स्थापन करणार.
- शैक्षणिक आणि शेतीविषयक वस्तूंवर जीएसटी आकारणार नाही.
- कामगारांचं किमान वेतन प्रतिदिन 400 रुपये असेल यासाठी प्रयत्न करू



# रक्तदान शिबिरात 340 रक्तदात्यांचे उत्स्फूर्त रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** मानव एकता दिवसाचे औचित्य साधून २४ एप्रिल बुधवार रोजी छत्रपती संभाजीनगर विभागातील सिंधी कॉलनी सत्संग भवन या ठिकाणी सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या असीम कृपेने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत निरंकारी मिशनची समाजकल्याण शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने सकाळी ८ ते ४ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मानवतेच्या भल्यासाठी 340 रक्तदात्यांनी रक्तदान करुन निःस्वार्थ सेवेचे उदाहरण प्रस्तुत केले संपूर्ण रक्त संकलन करण्यासाठी शासकीय वैद्यकीय टीम होती.

शिबिराचे उद्घाटन डॉ.कैलास अंभोरे (सहायक प्राध्यापक मराठी विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) यांनी केले यावेळी मंडळाचे जिल्हासंयोजक डी जी दळवी, पूर्व क्षेत्रीय संचालक हरिलाल नाथानी, मुखी सचिन अधाने, क्षेत्रीय संचालक विजय बोडखे, रक्तपेढी प्रमुख सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उल्लेखनीय आहे, की युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांनी सन् 1986 मध्ये सुरु केलेल्या रक्तदानाच्या परोपकारी मोहिमेने आता महाअभियानाचे रूप धारण केले असून त्याचा चरमोत्कर्ष झाल्याचे पहायला मिळत आहे. या शिबिरांमध्ये आतापर्यंत 13,31,906 युनिट रक्त मानवमात्राच्या भल्यासाठी दिले गेले असून या सेवा निरंतर जारी आहेत.

# अवैध सुगंधित तंबाखू पोलिसांकडून जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणुक संपताच स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपुर पुन्हा अँक्शन मोडवर आले असून चंद्रपुर जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या कारवाईत 41,27,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

23 एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारा कडुन पो.स्टे. भद्रावती हद्दीत मौजा घोडपेठ येथिल मुख्य चौकातील खर्रा व्यावसायिक महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखूची आपल्या घरात अवैधरित्या साठवणुक करुन विक्री करीत असल्याची माहीती मिळाली. सदर माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा घोडपेठ येथिल खर्रा व्यावसायिक नामे सुमेध उर्फ समिर देवगडे यास ताब्यात घेवुन त्याचे घराची झडती घेतली असता त्याचे घरी कि.अं. 47,000 रु. चा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुंगधित तंबाखू मिळून आला. सदरचा गुन्हा पो.स्टे. भद्रावती येथे नोंद करुन मुद्देमाल व आरोपी यास पुढील तपासकामी पो.स्टे. भद्रावती यांचे ताब्यात देण्यात आले.

तसेच 24 एप्रिल रोजी पहाटे 4.00 वा. सुमारास गोपनिय बातमीदाराकडुन खबर मिळाली की, नागपुर - चंद्रपुर महामार्गाने दोन ट्रकांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करुन तेलंगाना राज्यात नेत आहे. सदर माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा पडोली येथिल एमआयडीसी चौकात नाकाबंदी केली असता बातमीदाराने दिलेल्या माहीतीप्रमाणे अशोक लेलँड कंपनिचे दोन ट्रक एम एच 34 एबी 9001 व एम एच 34 एबी 6202 संशयास्पद रित्या येतांना दिसुन आले. नाकाबंदी दरम्यान सदर वाहनांना थांबण्याचा इशारा केला असता दोन्ही ट्रक नाकाबंदी मध्ये न थांबता भरधाव वेगाने घुग्घूस च्या दिशेने पळुन जात असताना सदर दोन्ही ट्रक चे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाठलाग करुन मौजा चिंचाळा गावाजवळ थांबवुन वाहनांची पाहणी केली असता सदर दोन्ही ट्रक मध्ये क्षमतेपेक्षा जास्त अवैधरित्या जनावरांना क्रुरतेने पाय, मान व तोंडाला दोरीने बांधुन, गाडीत कोंबून चारा पाण्याची कशाचीच व्यवस्था न करता जनावरांना कत्तलीकरीता/कटाई करण्याकरिता तेलंगाणा येथे घेवून जात असल्याचे दिसुन आले. सदर दोन्ही ट्रकमध्ये एकुण 53 नग गोवंश जनावरे कि. अं. 20,60,000/- रु., दोन ट्रक कि. 20,00,000/-रु. व दोन मोबाईल कि. 20,000/- असा एकुण 40,80,000/- रु. (चाळीस लाख ऐंशी हजार रुपये) चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही ट्रक मधील इसम नामे  वसिम खान युनुस खान वय 19 वर्षे रा. आर्णी जि. यवतमाळ ह.मु. वार्ड नं. 4 गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपुर,  फारुख खान गफ्फार खान वय 25 वर्षे रा. आर्णी जि. यवतमाळ ह.मु. वार्ड नं. 4 गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपुर यांचेवर कलम 429 भादवि, सहकलम 11(1), (ड) प्रा. नि. वा. कायदा 1960, सहकलम 5 अ (1),5 ब,9,11 महा. प्रा. संरक्षण कायदा, सहकलम 83,130/177, मोवाका अन्वये पो.स्टे. पडोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस पुढील तपासकामी पो.स्टे. पडोली यांचे ताब्यात देण्यात आले. उपरोक्त कारवाई  पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक  रिना जनबंधु यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. महेश कोंडावार यांचे नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, पोहवा धनराज करकाडे, स्वामीदास चालेकर, गजानन नागरे, अजय बागेसर, पोअं. प्रशांत नागोसे, चापोहवा दिनेश अराडे स्थागुशा चंद्रपुर यांनी सापळा रचुन यशस्वीरीत्या कारवाई केली.



# धर्माबाद येथील विस्डम स्कूलचे प्राचार्य औसाजी जाधव यांना विद्यारत्न पुरस्कार प्रदान!

आधुनिक केसरी न्यूज



**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्तम पायाभूत सुविधा देणारे, प्रसिद्धी पासून दूर राहत "विद्यार्थ्यांचा विकास हाच माझा ध्यास" हे ब्रीदवाक्य उराशी बाळगणारे येथील विस्डम स्कूलचे कृतिशील प्राचार्य औसाजी जाधव यांना ए.ई.एम.एस. चा मानाचा असा विद्यारत्न पुरस्कार मिळाला असून नांदेड येथे झालेल्या एका शानदार कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते तो पुरस्कार त्यांना वितरित करण्यात आला.

असोसिएशन ऑफ इंग्लिश मीडियम स्कूल तर्फे इंग्लिश मीडियम शाळेच्या निकष पूर्ण प्रगतीपथात सहभागी असलेल्या शाळांना व प्राचार्यांना हा राज्यस्तरीय मानाचा सन्मान देण्यात येतो. त्यासाठी पुरस्कार प्राप्त संस्थांना व व्यक्तींना त्यांच्या कार्याची कसून परीक्षा द्यावी लागते. एक तटस्थ कमिटी त्यांच्या एकंदरीत कार्याचे निकष पूर्ण मूल्यमापन करीत असते.

धर्माबाद येथील विस्डम स्कूलचे प्राचार्या औसाजी जाधव हे सुरुवातीपासूनच हाडांचे शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते अहोरात्र कष्ट घेत असतात. त्यासाठी शाळेचा प्राथमिक विकास, शाळेचा निकाल, शाळेची पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्या अनुषंगाने ती शाळा तालुक्यात स्तरावर सर्वोत्तम शाळा ठरते का? या सर्व परीक्षेत नांदेड जिल्ह्यातून ग्रामीण भागात सर्वोत्तम पायाभूत सुविधा देणारे विस्डम स्कूल हे पात्र ठरले असून त्या निकषावर जाधव सरांना उपरोक्त पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी असोसिएशन ऑफ इंग्लिश मीडियम स्कूल चे अध्यक्ष केशव सर यांच्यासह असोसिएशनचे सर्व कृतीशील सदस्य नांदेड येथील कार्यक्रमात उपस्थित होते. त्या पुरस्कारासोबतच 25 वर्षांपेक्षा जास्त शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे शिक्षारत्न पुरस्कारही उपरोक्त संस्थेने प्रदान केले असून नांदेडच्या नागार्जुन इंग्रजी शाळेच्या शैला पवार, ऑक्सफर्ड शाळेच्या अनुराधा, ब्ल्यू बेल्स च्या लक्ष्मी आणि खलसे आदींना शिक्षारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपरोक्त पुरस्कार मिळाल्यावर विस्डम शाळेवर व प्राचार्य औसाजी जाधव यांच्यावर कौतुकाचा पाऊस पडत आहे.

# संविधान बदलण्यासाठीच मोदी-शाहांचा चारशेपारचा नारा : प्रा. रामचंद्र भरांडे

आधुनिक केसरी न्यूज



**हिमायतनगर :** शहरातील परमेश्वर मंदीरसमोरील बसस्थानक परिसरात महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारार्थ सभा उशीरा सायंकाळी आठ वाजता सुरु झाली होती. महाविकास आघाडीच्या  प्रमुख कार्यकर्त्यांचा सत्कार होऊन काहीची भाषणे रात्री ०९:३० वाजेपर्यंत पर्यत झाली होते. प्राध्यापक रामचंद्र भरांडे सर आपल्या मनोगतात म्हणाले की, नरेंद्र मोदीनी व अमित शहा यांनी जो नारा दिला अब की बार चारसौ पार, म्हणजे भारतीय संविधान बदलण्यासाठी हे सगळे षडयंत्र आहे.आता मतदारांनी ओळखले पाहिजे. ते आम्ही सर्व अभ्यास करुन, अखेर बिनशर्त जाहीर पाठिंबा आमच्या संघटनेचा दिला आहे.आपण सर्व मिळुन महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना निवडून आणुया असे आवाहन केले आहे. प्रा. नितीन बानगुडेचे भाषण सुरु झाले आणि मोठ्या पावसाला सुरुवात झाली. पडत्या मोठ्या पावसात भाषण चालू असतांना समोरील कार्यकर्त्यांचा टाळ्याचा कडकडाट सुरु होता. त्यांच्या आवेश पूर्ण भाषणाने सर्वांना खिळून ठेवले होते. प्रचार सभेला संबोधित करतांना प्रा. नितीन बानगुडे पाटील म्हणाले, ही लोकसभेची निवडणूक गद्दारांना धडा शिकविण्यासाठी असून संविधान रक्षणासाठीचीआहे. पूर्वी राजाचा जन्म राणीच्या पोटातून होत होता. आता राजाचा जन्म मतपेटीतुन होत आहे. २०१९ च्या निवडणूकीत मांजरीची पिल्ल जन्मताच म्हणत होती. अच्छे दिन! अच्छे दिन!! पण आता २०२४च्या निवडणूकपूर्वीच डोळे उघडल्या नंतर तिच पिल्ल म्हणायला लागली बुरे दिन! बुरे दिन!! शेतकऱ्यांच्या शेतीउपयोगी खते औषधे बी बियाणे सर्व काही टॅक्स फ्री मिळत होते.परंतु भाजप पक्षाच्या काळात आठरा टक्के जीएसटी भरावी लागत आहे. जीएसटीतून लुट करायची आणि शेतकरी सन्मान निधी सहा हजार द्यायचा हे मतदाराने ओळखावे, असे आव्हान करुन शेतकऱ्यांना हमीभाव ही दिला नाही. महागाई, बेरोजगारी, भाववाढ, यामुळे जनता वैतागली आहे. तेव्हा भारताच्या संसदेत महाविकास आघाडीचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांचे एक नंबरचे बटन दाबून विजय करा असे आव्हान प्रा. नितीन पाटील बानगुडे यांनी भर पावसातील सभेत केले. हिमायतनगर बस स्थानकातील महाविकास आघाडीचे हिगोली उमेदवार माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारार्थ सभा आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी व्यासपीठांवर शिवसेना ठाकरे गटाचे व्याख्याते तथा मुख्य वक्ते प्रा. नितीन बानगुडे पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख बबनराव थोरात, उमरखेडचे माजी आमदार विजय खडसे, लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक रामचंद्र भरांडे, शिवसेनेचे सचिन चराटे, ज्ञानेश्वर भवर, ठाकरे गट शिवसेना तालुकाप्रमुख अध्यक्ष विठ्ठल ठाकरे, काँग्रेसचे ता.अध्यक्ष गजानन सुर्यवंशी, माजी जि.प. सदस्य सुभाष दादा राठोड, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे ता.अध्यक्ष प्रा. सुनिल पतंगे, सभापती कृषी उत्पन्न बाजार समितीचे जनार्धन ताडेवाड, शिवाजी पाटील, सरपंच संघटना तालुकाध्यक्ष परमेश्वर गोपतवाड, सरपंच बालासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष अब्दुल अखिल, माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड, लोकस्वराज्य आंदोलनाचे बाळासाहेब टिकेकर डौरकर, धोंडोपंत बनसोडे, सदानंद ऐरणकर पार्डीकर, रफीक सेठ, शिवाजी माने, डॉ.प्रकाश वानखेडे, संतोष आंबेकर, शहराध्यक्ष संजय माने, प्रविण कोमावार, ज्ञानेश्वर शिंदे,गोविंद शिंदे आदी सह कार्यकर्ते होते. प्रस्ताविक प्रा.सुनिल पतंगे यांनी केले. शिवसेनेचे सचिन सराटे, लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्रजी भरांडे यांनी आपल्या समर्थकांसह बिनशर्त जाहीर पाठींब्याचे पत्र महाविकास आघाडी पक्षाच्या उमेदवारास शिवसेना ठाकरे गटाचे व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांच्याकडे दिले आहे.

यावेळी आमदार माधवराव पाटील जवळगांवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी आमदार विजय खडसे म्हणाले,ही निवडणूक मतदाराने महागाई, भाववाढ,बेरोजगारीमुळे मनावर घेतली आहे. मोदी चारसे पार नाहीआता तडीपार असा उलेख करुन भ्रष्टाचार केलेल्या नेत्यांना भाजपात घेतले जात आहे.असा आरोप सुद्धा केला आहे.

# विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची माफी मागा!

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे शरद पवार यांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** भाजपा-महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांना पाठिंबा दिल्याबद्दल अमरावतीकरांची माफी मागण्याऐवजी, केंद्रात कृषीमंत्री असूनही शेतकऱ्यांसाठी, विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी काहीच न केल्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांची, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांची माफी मागून प्रायश्चित्त घ्या, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी अमरावती येथील जाहीर विजय संकल्प सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दिले.
अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा-महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ भर पावसात झालेल्या सभेत आज अमित शाह यांनी शरद पवार, उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. काँग्रेस, इंडी आघाडीचाही त्यांनी खरपूस समाचार घेतला. शरद पवार हे महाराष्ट्रात मुख्यमंत्री होते, केंद्रात कृषीमंत्री होते, पण विदर्भातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी काहीच केले नाही, त्यामुळेच विदर्भातील हजारो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ ओढवली. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याग्रस्त कुटुंबांची माफी मागा, असे आव्हानही त्यांनी दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उमेदवार नवनीत राणा, खा. डॉ .अनिल बोंडे, आ. प्रवीण पोटे, आ. प्रकाश भारसाकळे, आ. रवी राणा, भाजपा प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक आदी याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.भाजपाला 400 हून अधिक जागांवर विजय मिळाला तर संविधान बदलणार, आरक्षण रद्द करणार, असा अपप्रचार काँग्रेसकडून केला जात आहे. या अपप्रचाराला बळी पडू नका, गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने आरक्षण रद्द केले नाही, तर बहुमताचा वापर करून 370 कलम रद्द केले, दहशतवाद संपविला, तिहेरी तलाक प्रथा रद्द केली, आणि सीएए कायदा जारी करण्यासाठी बहुमताचा उपयोग केला. जोपर्यंत देशात भारतीय जनता पार्टी आहे, तोवर एससी, एसटी व ओबीसींचे आरक्षण कोणीही रद्द करू शकणार नाही, ही मोदींची गॅरंटी आहे, अशी ग्वाही श्री.शाह यांनी दिली. नवनीत राणा यांच्यासाठी दिले जाणारे एक-एक मत नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महत्वाचे आहे, देशातील दहशतवाद आणि नक्षलवाद समूळ नष्ट करण्यासाठी महत्वाचे आहे आणि भारताला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करण्यासाठी महत्वाचे आहे. तुमचे प्रत्येक मत देशप्रेमी आणि देशविरोधी यांच्यातील लढाईत देशप्रेमींच्या बाजूने जाणार आहे, परिवारवादी आणि रामराज्यवादी यांच्यातील लढाईत रामराज्यासाठी जाणार आहे, असेही ते म्हणाले. शाह म्हणाले की,अयोध्येतील राम मंदिराला काँग्रेसचा व इंडी आघाडीचा कायमच विरोध होता. त्यामुळेच स्वातंत्र्य मिळून 70 वर्षानंतरही काँग्रेस व त्यांच्या आघाडीने अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न लोंबकळत ठेवला. सत्तेवर आल्यानंतर पाच वर्षांतच मोदी यांनी राम मंदिराची उभारणी केली, आणि रामलल्लाची प्रतिष्ठापना करून मोदी यांनी रामभक्तांची अनेक दशकांची इच्छाही पूर्ण केली. या मंदिरातील रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी नकली शिवसेनेचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांना निमंत्रण दिले,पण सोनिया गांधींच्या भीतीने त्यांनी ते नाकारले. शरद पवारांनाही निमंत्रण दिले,पण प्रकृतीचे कारण देत त्यांनी पाठ फिरविली. प्रकृती ठीक नव्हती, तर आता प्रचारासाठी कसे हिंडता, असा खोचक सवालही त्यांनी केला. या लोकांनी मंदिर उभारणीत अडथळे आणलेच, पण प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण नाकारून रामाचा अपमान केला, अशी टीकाही त्यांनी केली. केवळ अयोध्याच नव्हे, तर केदारनाथ,बद्रीनाथ, सोमनाथ आदी पवित्र स्थानांचे पुनरुज्जीवन मोदी यांनी केले, असे ते म्हणाले. दहा वर्षांत मोदीजींनी देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणली. पुन्हा सत्तेवर आल्यावर पाच वर्षांतच अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर येणार असून याचा फायदा, दलित, आदिवासी,वंचित,उपेक्षित सर्वांना होणार आहे. म्हणूनच, मोदीजींच्या झोळीत मतांचे दान टाकून भाजपाला प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

# शक्तीचा सदुपयोग केल्यानेच हनुमंत चिरंजीव : मुनगंटीवार

## मनीष महाराज यांच्यावतीने आयोजित हनुमान जयंती कार्यक्रमात प्रतिपादन



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रावण आणि हनुमान दोघेही शक्तिशाली होते. रावणाने आपल्या शक्तीचा दुरुपयोग केला, तर हनुमानाने सदुपयोग केला. त्यामुळे युगानुयुगे लोटल्यानंतर आजही रावणाचे दहनच होत आहे आणि विश्वाच्या कल्याणासाठी आणि रावणाच्या तावडीतून माता सीता यांना मुक्त करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हनुमानाची पूजा होत आहे. आणि त्याच कारणाने हनुमंत चिरंजीव आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. मुल मार्गावरील चिचपल्ली येथे भागवताचार्य श्री मनीषजी महाराज यांच्या वतीने आयोजित हनुमान जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भागवताचार्य श्री मनीष महाराज, डॉ. तन्मय बिडवाई, भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, श्री मधू महाराज उपस्थित होते. यावेळी बोलताना मुनगंटीवार म्हणाले की, 'गेल्या वर्षी दिवाळीत आपण चिचपल्ली येथे ६५ फुटाच्या श्री हनुमान मूर्तीला विद्युत रोषणाई करण्याचा शब्द दिला होता. हनुमान जयंतीच्या पावन पर्वावर दिलेला शब्द पूर्ण करताना आपल्याला आनंद होत आहे. लवकरच या परिसरातून महामार्गाचे काम पूर्ण होणार आहे. नव्या महामार्गावरून प्रवास करताना विविध राज्यातील भक्तांना हनुमंताचे दर्शन होईल, असे मुनगंटीवार म्हणाले. हनुमान मंदिराच्या परिसरात वेगवेगळी भजने आणि भक्तीगीते ऐकायला मिळतील. त्यामुळे चिचपल्ली भागात कायम भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेता येईल, असा विश्वास मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. मूर्तीच्या रोषणाईच्या लोकार्पणानंतर सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हनुमानाची महाआरती करण्यात आली.

# विधान परिषदेची आगामी कोकण पदवीधर निवडणूक काँग्रेस लढवणार : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** आगामी विधान परिषद कोकण पदवीधर मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार दिला जाईल. मागील काही महिन्यांपासून काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कोकण विभागात पदवीधर मतदारांची नाव नोंदणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले आहे. राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, माकपासह इतर मित्रपक्ष यांची महाविकास आघाडी असून काँग्रेसचा उमेदवार निश्चित विजयी होईल असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाचा उमेदवार उभा करावा यावर सर्व बाजूंनी विचार करण्यात आला. कोकण विभागातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार द्यावा अशी आग्रही मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. भारतीय जनता पक्षाच्या सरकारला जनता कंटाळलेली असून भाजपा महायुतीला घरी बसवण्याचा निर्णय जनतेने केला आहे असेही नाना पटोले म्हणाले.

# बाजार सावंगी येथे यात्रेनिमित्त जंगी कुस्ती आखाड्यांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे रेणुका माता यात्रा महोत्सव निमित्त दि.२८रविवारी दुपारी जंगी कुस्ती आखाड्यांचे आयोजन करण्यात आले आहे. रेणुका माता मंदिर विश्वस्त तथा ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्तमाने ह्या कुस्ती आखाड्यांचे आयोजन करण्यात येते.पंचमी तथा यात्रा महोत्सवांच्या निमित्ताने सावंगी सह पंचक्रोशीतील नवतरुण तरुण यांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम सुदृढ निरोगी राहावे यासाठी परंपरागतरित्य कुस्ती खेळ तरुणांनी अंगकारावे म्हणून विश्वस्त तथा ग्रामपंचायत यात्रेच्या माध्यमातून करत असतात. विश्वस्त ट्रस्टी तथा ग्रामपंचायत कार्यालय कार्यकारिणी कडून कुस्ती खेळवत बक्षिस वितरण करतात हे विशेष.



# वैशाली जाधव त्रिभुवन यांना पीएच.डी. प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठाअंतर्गत समाजशास्त्र विषयात वैशाली अशोक जाधव यांना पीएच. डी.पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी डॉ.स्मिता अवचार यांच्या मार्गदर्शनात "माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थिनींच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावर शोधप्रबंध सादर केला.

# आता जनतेला निर्णय घ्यायचाय : उपमुख्यमंत्री फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** लोकसभा निवडणुकीच्या दुसरा टप्प्यातील प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आज दिवसभरात महाराष्ट्रात विविध मतदारसंघात जाहीर सभा पार पडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अमरावती लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सभा पार पडली. या सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. अमरावतीमध्ये आज या ठिकाणी सर्वांत मोठी सभा होत आहे. ही निवडणूक देशाची निवडणूक आहे. हा देश कोणाच्या हातात द्यायचा, याचा निर्णय घेण्याची ही निवडणूक आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, तर दुसरीकडे राहुल गांधी आहेत. त्यामुळे आता जनतेला निर्णय घ्यायचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, रासप, मनसे असे वेगवेगळे पक्ष आहेत. असे वेगवेगळ्या पक्षांबरोबर आपली महायुती आहे", असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. राहुल गांधी यांच्याकडे २६ पक्षांची खिचडी आहे. त्यामुळे राहुल गांधी यांना त्यांच्या आघाडीतील पक्ष नेते मानायला तयार नाहीत. त्यांच्याच आघाडीमधील एक नेते राहुल गांधी हे अपरिपक्व असल्याचे म्हणाले. ते असेही म्हणाले की, राहुल गांधी देशाचे नेतृत्व करु शकत नाहीत. आता सांगा त्यांच्या आघाडीची अवस्था अशी आहे. राहुल गांधी यांना नेता मानायला शरद पवार आणि उद्धव ठाकरेही तयार नाहीत. संजय राऊत यांनी तर घोषित करुन टाकले की, उद्धव ठाकरे हे देशाचे पंतप्रधान होतील. मला सांगा ज्यांचा एकही व्यक्ती निवडून येऊ शकत नाही, ते कधी देशाचे पंतप्रधान होतील का?", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली. फडणवीस म्हणाले, शरद पवार अमरावतीत आले होते. तेव्हा ते म्हणाले, मागच्या निवडणुकीत नवनीत राणा यांना पाठिंबा दिला म्हणून माफी मागतो. पण शरद पवार साहेब तुम्हाला जर माफी मागायची असेल तर तुम्ही सातत्यांनी विदर्भावर अन्याय केला. तुम्ही अमरावतीवर अन्याय केला. आज नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अमरावतीत टेक्सटाईल पार्क आला, विमानतळाला गती मिळाली, क्रिडा विद्यापीठ आले, अमरावतीत विकासाला सुरुवात झाली, त्यामुळे जर माफी मागायची असेल तर या जनतेची माफी मागा, असा हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी केला.



# इंडिया आघाडीचे सरकार येताच शेतकऱ्यांना कर्जमाफी

## राहुल गांधी : सत्ता जाण्याची भितीने मोदी घाबरले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** लोकसभेची ही निवडणूक लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एका राजकीय पक्षाने संविधानावर आक्रमण करून ते संपवण्याचे काम केले जात आहे. इंडिया आघाडी लोकशाही व संविधानाचे रक्षण करत असताना भारतीय जनता पक्ष, नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मात्र संविधान व लोकशाही संपवण्याचा प्रयत्न करत आहेत, हे त्यांचे लक्ष्य आहे. सत्तेत आल्यानंतर संविधान बदलणार हे भाजपाचा खासदारच जाहीरपणे सांगत आहे. असे असले तरी संविधानला कोणतीही शक्ती बदलू शकत नाही. संविधान हे एक पुस्तक नसून गरीब, आदिवासी, दलित, सर्वसामान्य नागरिकांच्या अधिकारांचा दस्ताऐवज आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडी ते कोणालाही बदलू देणार नाही, असा खणखणीत इशारा काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी दिला आहे.

इंडिया आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अमरावती व सोलापुरात राहुल गांधी यांच्या भव्य जाहीर सभा झाल्या. या सभेत बोलताना राहुल गांधी म्हणाले की, नरेंद्र मोदी यानी १० वर्षात शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही परंतु इंडिया आघाडीचे सरकार येताच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. यासाठी एक आयोग स्थापन केला जाणार असून या आयोगाने शिफारस केली की शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, एकदा नाहीतर अनेकदा कर्जमाफी केली जाईल. देशात पैशांची कमी नाही, अरबपतींचे कर्जमाफ होऊ शकते तर शेतकऱ्यांचेही कर्ज माफ झाले पाहिजे. शेतकऱ्यांबरोबरच देशातील गरीब महिलांसाठी लखपती बनवले जाईल. गरिब कुटुंबातील महिलेच्या बँक खात्यात १ लाख रुपये थेट जमा केले जातील म्हणजे महिन्याला ८५०० रुपये देणार. देशात ४५ वर्षातील सर्वात जास्त बेरोजगारी आहे, या बेरोजगारीवत मात करण्यासाठी नवीन कायदा बनवला जाणार असून पदवीधर, डिप्लोमा धारकांना प्रशिक्षणाची सुविधा दिली जाईल व त्यांना एक वर्षाचे एक लाख रुपये देण्यात येतील. एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर देशात प्रशिक्षित युवा फोर्स तयार बनेल.

नरेंद्र मोदींनी देशातील २२ अरबपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. नोटबंदी करुन काळा पैसा बाहेर करण्याचे आश्वासन दिले पण याचा फायदाही मोदींच्या मित्रांनाच झाला. जीएसटीचे पैसे जनतेकडून वसूल करुन मुठभर उद्योगपतींच्या खिशात घातले. नरेंद्र मोदी हे अरबपतींचे नेते आहेत गरिबांचे नेते नाहीत. सत्ता जाण्याची भिताने नरेंद्र मोदी घाबरले आहेत आणि मोदी घाबरले की खोटे बोलण्यास सुरुवात करतात. इलेक्टोरल बाँडमधील भ्रष्टाचार पकडला गेल्याने मोदींची चिंता आणखी वाढली आहे.

नरेंद्र मोदी सरकार हे दलित, आदिवासी विरोधी आहे. आदिवासींना भाजपा वनवासी म्हणून अपमान करते. अयोध्यातील राम मंदिराच्या उद्घाटनात देशाच्या राष्ट्रपती आदिवासी आहेत म्हणून बोलावले नाही तसेच संसदेच्या उद्घाटनालाही मोदी यांनी बोलावले नाही. भाजपा आदिवासी समाजावर अन्याय करते पण आदिवासी, दलित, मागासर्गीय, अल्पसंख्याक समाजाला सामाजिक न्याय देण्यासाठी काँग्रेस पक्ष जातनिहाय जनगणना करणार व सामाजिक, आर्थिक सर्वे करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेईल, असेही राहुल गांधी यांनी सांगितले.

या प्रचार सभेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री व CWC सदस्य खा. चंद्रकांत हंडोरे, आ. यशोमती ठाकूर, सुनिल देशमुख, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष आ. वजाहत मिर्झा, शेतकरी नेते व पत्रकार प्रकाश पोहरे, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, अमरावती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बब्लू देशमुख आदी उपस्थित होते.

सोलापुरच्या सभेला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माकपा नेते व माजी आमदार नरसय्या आडम, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरुटे यांच्यासह इंडिया आघाडीचे नेते उपस्थित होते.

# विधायक उपक्रमासह विवाह सोहळात 33 हजारांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** डॉ. ज्ञानेश्वर माऊली दरंदले व डॉ.माणिकराव दरंदले यांची पुतणी व श्री बाळासाहेब दरंदले यांची कन्या इंजिनियर ऐश्वर्या व बँक ऑफ महाराष्ट्रचे मॅनेजर श्री. सोपानराव झिने साहेब यांचे चिरंजीव इंजिनीयर सचिन यांचा विवाह सोहळा सोनई येथे अत्यंत आनंदात व उत्साहात संपन्न झाला.या विवाह सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातले नामांकित अतिथी उपस्थित शुभ आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते .या शुभविवाह मध्ये सत्कार या प्रथेला फाटा देवून समाजशील उपक्रमांना मदत करण्यात आली. श्री शनिश्वर विद्यालय सोनई या विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी 11000 रुपये मदत देण्यात आली. तसेच श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान सोनई यांना मंदिर बांधकामासाठी 11000 रुपये मदत देण्यात आली. श्रीराम मंदिर लांडेवाडी या नियोजित मंदिरासाठी देखील 11000 रुपयाची देणगी देण्यात आली. अशी एकुण 33000/- ची आर्थिक मदत केली. शनिश्वर विद्यालयाचे प्राचार्य खोसे, श्री ढाले ,श्री. कर्जुले ,श्रीम.घाडगे मॅडम, श्री गडाख तसेच त्यांचे सहकारी यांनी मदत स्वीकारली व आभार व्यक्त केले. तुळजाभवानी प्रतिष्ठानच्या वतीने गोरक्षनाथ दरंदले,श्री आबासाहेब दरंदले श्री एकनाथ दरंदले यांनी मदत स्वीकारली व श्रीराम मंदिर लांडेवाडी यांचे वतीने लांडेवाडी सोसायटीचे चेअरमन संजय दरंदले यांचेसह देवीदास लांडे, श्रीहरी लांडे, श्री नितीन दरंदले, सोमनाथ लांडे यांनी मदत स्वीकारली व आभार मानले . सोनई परिसरामधे या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक होत आहे. सर्वांनी यापासून प्रेरणा घेऊन विधायक उपक्रमामध्ये सहभागी होण्याची आवश्यकता आहे.





सिडको एन-३ मधील संकटमोचन हनुमान मंदिरात आज खूप मोठ्या उत्साहात हनुमानाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. (छायाचित्र : सुधीर कोर्टीकर)

# राजेंद्र वाघमारे यांचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** जिल्ह्यातील राजकारण नात्यागोत्याचे असुन येथील सहकार सम्राट शोषित वंचित दुर्लक्षित घटकातील नेतृत्व जन्मालाच येऊ देत नाही चाळीस वर्षे काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले अनुसूचित जाती विभागाचे जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वाघमारे यांनी काँग्रेस नेतृत्वावर गंभीर आरोप करत जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याने जिल्हा काँग्रेसमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्याने येथे बौद्ध समाजाच्या उमेदवारांना जाणीवपुर्वक डावलले जात आहे. गेले नऊ -दहा वर्ष काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असताना शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळेल या भावनेतून राजेंद्र वाघमारे यांनी दोन-तीन वर्ष शिर्डी लोकसभा मतदार संघात सातत्याने संपर्क ठेवून काँग्रेस पक्ष वाढवण्याचे काम केले मात्र जागा वाटपाच्या वेळी त्यांना निराशा पत्करावी लागली. श्री वाघमारे शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी करण्यासाठी सर्व बाजूंनी योग्य असतानाही आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस पक्षाचे चांगलं वातावरण असूनही ही उमेदवारी काँग्रेसने न घेणे हा त्यांच्या सारख्या निष्ठावान कार्यकर्त्यावर अन्याय आहे, असे मत यावेळी राजेंद्र वाघमारे यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील काँग्रेस नेतृत्व बौद्ध समाजाला कायम डावलत असल्याचा आरोप करत काँग्रेसमध्ये बौद्ध समाजाचा निव्वळ वापर होत असुन माझ्या नंतरही काँग्रेस नेतृत्वावर नाराज असलेले अनेक जण काँग्रेसमधून बाहेर पडण्याची शक्यता देखील राजेंद्र वाघमारे यांनी वर्तविली.

# प्रवरासंगम येथे जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** तालुक्यातील प्रवरा संगम येथे शब्दगंध साहित्यिक परिषद शाखा नेवासा यांच्या वतीने जागतिक पुस्तक दिन मारुती मंदिरात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरासंगमच्या सरपंच सौ.अर्चनाताई सुडके पाटील होत्या.प्रत्येकामध्ये वाचनाची आवड निर्माण होणे व त्यासाठी वाचन संस्कृती वृद्धिंगत होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ.अशोक ढगे यांनी यावेळी बोलताना केले यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी माजी कुलगुरू डॉ.अशोकराव ढगे,अशोक महाराज पांडव,शब्दगंध साहित्यिक परिषद शाखा नेवासा अध्यक्ष प्राचार्य डॉ. किशोर धनवटे,शेतकरी संघटनेचे नेते अंबादास कोरडे, प्रा. मोहनीराज कदम,अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य भाऊसाहेब चव्हाण,खेडले काजळीच्या माजी सरपंच सौ निर्मलाताई ढगे,शब्दगंधचे तालुका उपाध्यक्ष दिगंबर गोंधळी व कार्याध्यक्ष व लोककलाकार काकासाहेब गोंधळी, ह भ प व्यासपीठावर उपस्थित होते

जागतिक पुस्तक दिनाचे व वाचन संस्कृतीचे महत्त्व डॉ अशोकराव ढगे यांनी विशद केले.फिरते मोफत वाचनालय आपल्या दारी हा कार्यक्रम नेवासा तालुक्यात मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आला आहे समाजामधून याला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉक्टर किशोर धनवटे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे यांनी उपक्रमाला पुस्तके सस्नेह भेट दिली व हा उपक्रम समाजाला दिशा देणारा आहे अशी प्रशंसा केली. प्रवरा संगमचे माजी उपसरपंच अनिलराव बाकलीवाल महावितरणचे सेवानिवृत्त उपअभियंता द्विवेदी,आसाराम काळे पुरोहित, बंडातात्या जोशी, शांतवन खंडागळे उपस्थित होते. ह.भ.प. अशोक महाराज पांडव यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त करून सर्वांना आशीर्वाद पर दोन शब्द सांगितले.

# हनुमान जयंती भजने गात भक्तिमय वातावरणात साजरी

## भंडाऱ्यासह अखंड हरिनाम सप्ताह सारख्या विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शहर व परिसरात संकटमोचन हनुमंतरायाची जयंती भजने गाऊन मोठ्या भक्ति भावाने व उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने नेवासा तालुक्यात ठीकठीकाणी वाडयावस्तीवर ही भंडाऱ्यासह अखंड हरिनाम सप्ताह सारख्या विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नेवासा शहरातील मारुती चौकात असलेल्या हनुमान मंदिराम्ध्ये पहाटेच्या सुमारास घंटानिनादात पवनपुत्र हनुमान की जय,बजरंग बली की जय चा जयघोष करीत भाविकांनी पुष्पवृष्टी करत हनुमंतरायाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला.हनुमान भजनी मंडळाच्या सेवेकऱ्यांनी भजने गाऊन येथील वातावरण मंगलमय केले होते. या ठिकाणी रात्री भंडाऱ्याचा कार्यक्रम झाला. नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरामध्ये असलेल्या हनुमान मुर्तीस दुर्गादेवी तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अभिषेक घातला व खिरापतीचे वाटप



केले,मंदिरात हनुमान चालीसाचे पठन युवकांनी एकत्रित येऊन केले. संत तुकाराम महाराज मंदिरासमोरील हनुमान मंदिरामध्ये हिंदूराजे मित्र मंडळाच्या वतीने जयंती साजरी करण्यात येऊन सायंकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काशीविश्वेश्वर मंदिर प्रांगणातील हनुमान मूर्तीस अभिषेक घालण्यात येऊन प्रसाद वाटण्यात आला. अहिल्यानगर येथील हनुमान मंदिरात ही दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. संत ज्ञानेश्वर मंदिरामागे असलेल्या माळी वस्तीवर तसेच मध्यमेश्वरनगर येथील सूर्यमुखी हनुमान मंदिरामध्ये हनुमान जयंती निमित्ताने दिवसभर महाप्रसादाचे वाटप करण्यात येऊन भक्तिभावाने जयंती साजरी करण्यात आली. नेवासा तालुक्यात गाव तेथे हनुमंतरायाचे मंदिर असल्याने गावकऱ्यांनी एकत्रित येत मोठ्या भक्तिभावाने पवनपुत्र हनुमान की जय,जय श्रीराम असा जयघोष करत हनुमान जयंती साजरी केली. वाडयावस्त्यावरील नागरिकांनी एकत्रित येत आरती गात महाप्रसादाचे वाटप करून हनुमंतरायांच्या चरणी त्यांच्याबद्दल असलेला भक्तिभाव वृद्धिंगत केला. यावेळी परिसरातील वातावरण भक्तिमय व मंगलमय बनले होते.



# बॅकांमध्ये होणारे दैंनदिन व्यवहार व संशयास्पद व्यवहारांवर विशेष लक्ष द्यावे

## निवडणूक खर्च निरीक्षक ममता सिंग

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** राष्ट्रीयकृत, खासगी व सहकारी बँकांमध्ये बॅकांमध्ये होणारे दैंनदिन व्यवहार, संशयास्पद व्यवहारांवर विशेष लक्ष द्यावे. अशा सूचना निवडणूक खर्च निरीक्षक ममता सिंग यांनी बँकांशी संबंधित समन्वय अधिकाऱ्यांना आज येथे दिल्या. शिर्डी शासकीय विश्रामगृहात विविध यंत्रणेतील समन्वय (नोडल) अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा श्रीमती सिंग यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीसाठी उपस्थित असलेल्या पोलीस, राज्य उत्पादन शुल्क, बँक व आयकर विभागाशी संबंधित समन्वय (नोडल) अधिकारी यांच्या निवडणूक खर्च विषयक कामकाजाचा त्यांनी यावेळी आढावा घेऊन सूचना दिल्या.

खर्च निरीक्षक ममता सिंग यांनी यावेळी सर्व नोडल अधिकारी व खर्च व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच व योग्य प्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय अतिसंवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली व अशा भागात विशेष उपाययोजना राबविण्याबाबत उत्पादन शुल्क व पोलीस विभागास सूचना दिल्या. शिर्डी विधानसभा मतदार संघात असलेल्या देशी-विदेशी दारू विक्रीच्या परवानाधारक अनुज्ञप्त्यांच्या स्टॉक रजिस्ट्ररची नियमित तपासणी करण्यात यावी. असेही श्रीमती सिंग यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला उत्पादन शुल्क विभागाचे जिल्हा अधीक्षक प्रमोद सोनोने, शिर्डीचे पोलीस उपअधीक्षक शिरिष वमने, समन्वय अधिकारी (खर्च) सदाशिव पाटील, सहायक समन्वय अधिकारी (खर्च) बाबासाहेब घोरपडे व सचिन धस, सहायक खर्च निरीक्षक विवेक वर्मा, लीड बँकेचे जिल्हा व्यवस्थापक आशिष नवले, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी, आयकर विभागाचे समन्वय अधिकारी अशोक मुराई, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शिर्डी मतदार संघात आजी माजी खासदाराचे विकासात योगदान काय : संजय खामकर

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** महाराष्ट्राचे चर्मकार विकास संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय हरिश्चंद्र खामकर यांनी नुकतीच शिर्डी लोकसभा मतदारसंघातून बळीराजा पार्टी पक्षाकडून नुकताच खासदारकीचा उमेदवारी अर्ज दाखल केला असून यावेळी पक्षाचे पदाधिकारी महेंद्र धाडवे सत्यप्रकाश अर्जुने जकीर अन्सारी विनोधन मोर्या अरुण गाडेकर वकील आनंद लहामागे वकील अविनाश शेजवळ सिमोन जगताप आदीसह विविध पदाधिकारी हजर होते याप्रसंगी बोलताना संजय खामकर म्हणाले की शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या विकासात आजी-माजी खासदारांना विकासाची कामे करण्यात अपयश आले असून त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारे विकासाचा अजेंडा नाही खासदार लोखंडे हे निळवंडेचे श्रेय घेऊन पाणीदार खासदार म्हणून मी काम केले हे सांगत आहे तर मग नामदार राधाकृष्ण विखे व माजी महसूल मंत्री थोरात यांचे निळवंडे योगदान नाही का असा सवाल विचारत खासदार वाकचौरे यांचे वय झाले तरी त्यांना सत्तेचा मोह सुटत नसल्याने आपण ही उमेदवारी करत असल्याचे संजय खामकर यांनी सांगितले

खामकर म्हणाले की दोन्ही खासदारांची कामगिरी निराशदायक आहे हे जनतेच्या लक्षात आले आहे दोघांनी लोकसभेत कधी शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या प्रश्नावर प्रश्न विचारले नाही एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करून ते लोकांची फसवणूक करत आहेत पाणीदार खासदार हा लोखंडेचा ढोंगीपणा आहे दोन्ही खासदार कोरोना काळात कोठे होते जेव्हा लोक अडचणीत होते त्यावेळी आपण जनतेच्या बरोबर होतो असे सांगत आपण खासदार झालो तर शेतकरी विविध प्रश्न खते औषधे शेती अवजारांना सबसिडी बेरोजगारांना रोजगार या परिसरातील लोकांसाठी कारखानदारी असे विविध प्रश्न सोडवण्यासाठी आपण खासदारकीच्या माध्यमातून काम करणार असल्याचे सांगत जनता आता परिवर्तन करणार असल्याचे यावेळी सांगितले



# पुरवठा अधिकाऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तहसील विभागातील पुरवठा अधिकारी व नगर येथील भिंगार उपनगरातील कायम रहिवासी असलेले दिपक भिंगारदिवे (वय-४०) यांनी आज सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास विषारी औषध प्राशन करून आपली जीवन यात्रा संपवल्याची दुर्दैवी घटना आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास उघड झाली आहे.त्यामुळे कोपरगाव शहर आणि तालुक्यात खळबळ उडाली आहे. स्व.दिपक भिंगारदिवे हे अ.नगर येथील भिंगार येथील मूळ रहिवासी होते. त्यांची महसूल विभागात निवड झाली होती.त्यांनी या पूर्वीही काही वर्षांपूर्वी कोपरगाव तहसील कार्यालयात आपले कर्तव्य बाजवले होते.गत दोन दिवसापूर्वी त्यांनी दोन दिवस रजा टाकून आपल्या सोलापूर येथील नातेवाईकांना भेटण्यास ते गेले होते.व आज सकाळी ते कामावर हजर झाले होते.ते कामावर आल्यावर त्यांची अस्वस्थता जाणवत असल्याचेही माहिती तेथील कर्मचाऱ्यांकडून समजत असून थोड्या वेळात त्यांना त्या ठिकाणी उलट्या सुरु झाल्या होत्या.त्याची दखल घेऊन तेथील हमाल व अन्य पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने कोपरगाव बस स्थानकासमोरील डॉ.मुळे हॉस्पिटल मध्ये उपचारार्थ भरती केले होते.त्या ठिकाणी उपस्थित असललेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या घरी हि बाब त्यांच्या पत्नीस कळवली होती.त्यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली होती. त्यावेळी उपस्थितांना त्यांच्यात किरकोळ वाद असल्याचे समजत असून त्यातून एवढा टोकाचा निर्णय त्यांनी का घेतला ? असा सवाल निर्माण झाला आहे. दरम्यान उपचार सुरु होण्याच्या दरम्यान ते कोमात गेले असल्याची माहिती हाती आली असून घटनास्थळी महसुलचे अधिकारी संदीप भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आहे,मात्र उपयोग झाला नाही त्यांची प्राणज्योत मालवली आहे.या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे. दरम्यान त्यांच्या पश्चात आई,भाऊ,तीन बहीणी,पत्नी,मुलगा,एक मोठी मुलगी असा परिवार आहे.दरम्यान कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी आदींनी घटनास्थळी भेट दिली आहे.घटनास्थळी उंदीर मारण्याच्या औषधांची बाटली सापडली असून स्थळ पंचनामा करण्यात आला असल्याची माहिती पोलीसांनी दिली. कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# प्रयोग शाळा सहाय्यक मोहन मापारे सेवामुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** श्री रंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ आणे संचलित श्री भगवान विद्यालय बालमटाकळी येथील प्रयोग शाळा सहाय्यक श्री मोहन मापारे यांच्या प्रदिर्घ सेवे नंतर सेवापूर्ती समारंभ मोठ्या थाटात संपन्न झाला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री रक्टे यु के होते.या प्रसंगी विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्री मोहन मापारे व सौ मापारे यांचा पाच पोशाख शाल श्रीफळ देउन यथोचित सन्मान करण्यात आला.उपसरपंच सौ घोरपडे ,श्री जाधव सर ,श्री गाडे सौ.इंदुमती मापारे ,श्री विजय लेंडिळ, श्री बाबा देशमुख ,श्री लहू जगताप,श्री भारत घोरपडे,यांनीही श्री मोहन मापारे यांचा सन्मान केला.

विद्यालयातील पर्यवेक्षक श्री लक्ष्मण गागरे ,श्री रामदिस जवरे ,श्री आंधाळे सर श्री, राजेंद्र मराठे ,श्री बाबासाहेब देशमुख सौ. श्री भारत घोरपडे,सौ.श्रध्दा नजन श्री महादेव नजन ,कु.कविता नजन, श्री उत्तम रक्टे यांनी शुभेच्छा देतानी आपली भावना व्यक्त केल्या,पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री जोशी यांनी केले तर आभार श्री काटे राजेंद्र यांनी मानले.

